
# ज्ञान व करमणूक

सर्व वयाच्या मुलांमुलींसाठी



विदर्भ मराठवाडा बुक कंपनी: पुणे

# ज्ञान
# व
# करमणूक

[ सर्व वयाच्या मुलांमुलींसाठी ]

संयोजक
अ. ज. प्रभू

प्रकाशक
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१२३४ शुक्रवार पेठ, पुणे २

प्रकाशक :
अ. ज. प्रभू
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३३४ शुक्रवार पेठ, पुणे २

प्रथमावृत्ती १९७६



मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती, पुणे ३०

# नव्या युगाची चाहूल

आपणाकडे मुलांमुलींसाठी प्रयत्नपूर्वक अशी करमणूकप्रधान फारच कमी पुस्तके निघतात. त्यांतही मुलांच्या मानसशास्त्रीय प्रगतीला पोषक असे वातावरण निर्माण करणारी मनोरंजक पुस्तके तर अगदीच कमी.

करमणूकप्रधान अशी अनेक पुस्तके आपल्या मुलांसाठी असावीत ही माझी बऱ्याच वर्षांपासूनची इच्छा होती. आजच्या भारतीय मुलांच्या करमणुकीचे व ज्ञानाचे मूल्यमापन प्रगत देशांतील मुलांच्या तुलनेने ठरणार आहे. त्या दृष्टीनेसुद्धा लहानसा प्रयत्न म्हणून हे पुस्तक.

आजपर्यंत कोणत्याही भारतीय भाषेत मुलांसाठी न झालेला असा हा प्रयत्न आहे. नव्या युगाची चाहूल देणाऱ्या या पुस्तकाचे मुलांमुलींकडून स्वागत होईल याबद्दल मला मुळीच शंका नाही.

तसेच आपल्या मुलांना मनोरंजनाच्या चांगल्या सवयी लागण्यासाठी पालकांसही हे पुस्तक आवडेल असा मला विश्वास वाटतो.

या पुस्तकाला चित्रांचा व ठशांचा भरमसाठ खर्च आला. तथापी सर्व थरांतील पालकांना आपल्या मुलांसाठी घेता यावे म्हणून कमीत कमी किंमतीत हे पुस्तक देण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला आहे.

—अ. ज. प्रभू

मी अमुक गोष्ट करू शकेन,
अमुक करू शकणार नाही.
असल्या साऱ्या भावना खुळेपणाच्या होत.
आपण प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहोत.
आधी स्वतःवर विश्वास हवा–आत्मविश्वास हवा.
आत्मविश्वासाचा हा आदर्श सर्वच बाबतींत
अत्यंत साहाय्यक आहे.
या आदर्शाचा अधिक विस्तृत प्रमाणावर प्रचार होऊन
जर तो प्रत्यक्ष आचरणात आणला गेला असता
तर जगातील अधिकांश वाईटपणा
व दुःखे नाहिशी झाली असती.
मानवजातीचा इतिहास पाहिला असता
आपल्याला असे दिसून येते की,
समस्त थोर स्त्री-पुरुषांच्या जीवनात सर्वांहून बलशाली
अशी प्रेरक शक्ती जर कोणती असेल
तर ती म्हणजे आत्मश्रद्धाच होय !
'आम्ही थोर होऊ !' ही उपजत भावना घेऊनच
ते जन्माला आले.
खरोखरच ते थोर बनले ! !

—स्वामी विवेकानंद



# पाहू बरे तुमचे इतिहासाचे ज्ञान !

वरील फोटोसंबंधी खाली अ, ब, क मधे काही विधाने दिली आहेत. त्यांपैकी प्रत्येकी एक विधान वरील व्यक्तीसंबंधी आहे.

आता ओळखा पाहू ती व्यक्ती आणि त्या व्यक्तीसंबंधी केलेली विधाने !

[ अ ] ( १ ) रवींद्रनाथ टागोर ( २ ) कर्मवीर भाऊराव पाटील ( ३ ) आचार्य विनोबा भावे ( ४ ) संत तुळसीदास ( ५ ) लाओत्से

[ ब ] ( १ ) यांना नोबेल पारितोषिक मिळाले.
( २ ) यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शिक्षणप्रसाराचे कार्य केले.
( ३ ) महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या पहिल्या तुकडीचे नेतृत्व यांनी केले.
( ४ ) रामायणावरील यांचे रामायण भक्तिरसपूर्ण मानले जाते.
( ५ ) हा चीनच्या राजाचा ग्रंथपाल होता.

[ क ] ( १ ) यांनी शांतिनिकेतनची स्थापना केली.
( २ ) यांना पद्मभूषण ही पदवी सरकारने दिली.
( ३ ) भूदान चळवळीचे प्रणेते.
( ४ ) हे श्रेष्ठ रामभक्त होते.
( ५ ) यांनी 'ताओ ते किंग' नावाचा तत्त्वज्ञानाचा ग्रंथ लिहिला.

उत्तर अ = ५, ब = ५, क = ५


****************

# यांना मार्ग दाखवा

****************

यांना ओळखलंत ? हे मि. ससेराव. स्वारी जरा खुशीतच आहे. त्या खुशीचं कारणही तसंच आहे. जंगलचे प्रतिनिधी म्हणून ते नुकतेच युनोला भेट देऊन आलेत, म्हणून त्यांची कळी खुलली आहे. जंगलच्या भूमीवर ससेरावांचे पाय टेकतात न टेकतात तोच कोल्होबांचे जेवणाचे निमंत्रण येऊन थडकले. ससेरावांना अंगातील कोट काढण्यासुद्धा फुरसद मिळाली नाही. त्यांनी मामाचा पत्ता नीट न्याहाळला आणि ते लगबगा निघाले. बराच वेळ ससेराव चालत राहिले पण मामाच्या घरचा मार्ग काही सापडेना. ससेराव थांबले. त्यांचे डोके काही चालेना. रस्ता काही सुधारेना. आता आली का पंचाईत ?

ह्या मि. ससेरावांना आता तुमच्या मदतीची जरुरी आहे. तुम्ही त्यांना कोल्होबाच्या घरचा मार्ग त्वरित दाखवाल का ? पण फार वेळ लावू नका बुवा ! कारण ससेराव अतिशय भुकेलेले आहेत.



पुढील पानावर चार व्यक्ती आहेत. त्यांचा थोडक्यात परिचय याखाली दिला आहे. ज्या व्यक्तीच्या परिचयाला जो क्रमांक तोच क्रमांक त्या व्यक्तीला अशी पद्धत ठेवली होती. परंतु कंपोझिटरच्या फिरवाफिरवीमध्ये व्यक्तींचे ब्लॉक्स बदलले गेले. मात्र परिचयाला दिलेले क्रमांक होते तसेच राहिले. आता कंपोझिटरने बदलेल्या व्यक्ती योग्य क्रमांकावर आणून ठेवण्याचे काम तुम्ही करा.

१. चीनची प्रचंड भिंत ओलांडून चंगीझखान चीनमध्ये घुसला. त्याने पेकिंग ही चीनची राजधानी काबीज केली. चीनपासून युरोपमध्ये जर्मनीपर्यंत चंगीझखानाच्या फौजा सतत धुमाकूळ घालीत. या खानास धर्म, विद्या यांची बिलकुल पर्वा नव्हती. लक्षावधी लोकांच्या कत्तलीस कारणीभूत झालेला हा चंगीझखान इ. स. १२२७ मध्ये कास्पियन समुद्राच्या काठी मरण पावला.

२. चंगीझखानाच्या मरणानंतर त्याचे राज्य त्याच्या चार मुलांत वाटले गेले. एक मुलगा ओक्ताईखान हा आपल्या बापासारखा होता. त्याने रशिया, हंगेरी या देशांवर स्वारी करून मॉस्को, बुडापेस्ट इत्यादी शहरे जाळून टाकली. लोकांच्या कत्तली केल्या. याच ओक्ताईखानाचा पुतण्या कुब्लाईखान. हा एक चीनमधील प्रसिद्ध बादशाहा झाला. त्याने पेकिंग येथे इ. स. १२५७ ते १२९४ पर्यंत राज्य केले. १२९४ मध्ये हा हिवतापाने मृत्यू पावला.

३. मार्को पोलो हा इटलीचा भूमिसंशोधक. याने पर्शियामधून पामीरचे पठार गाठले. तेथून त्याने गोबीचे वाळवंट पार केले. अनेक रानटी माणसांच्या टोळ्या, गवताळ प्रदेश, चित्रविचित्र समजुती यांचे विविध अनुभव घेत, घेत मार्को पोलो इ. स. १२७५ मध्ये पेकिंग येथे कुब्लाईखानाच्या दरबारी पोहोचला. त्याचा हा प्रवास चार वर्षे चालला होता. परतीच्या प्रवासात पर्शिया, भूमध्य समुद्र इत्यादींवरून मार्को पोलो चोवीस वर्षांनी परत व्हेनिस येथील घरी आला.

४. कुतुबुद्दीन ऐबकने दिल्लीच्या तख्तावर येताच आपल्या नावाची नाणी पाडली. त्याला कलाकौशल्याची आवड होती. त्याने स्थापत्यकलेला उत्तेजन दिले. प्रसिद्ध कुतुबमिनार यानेच बांधला. कुतुबुद्दीन ऐबक हा इ. स. १२१० त अपघाताने मरण पावला.



(१)



(२)



(३)



(४)

**उत्तर** : क्रमांक २ ची व्यक्ती ( चंगीझखान ) क्रमांक १ वर
क्रमांक ३ ची व्यक्ती ( कुब्लाईखान ) क्रमांक २ वर
क्रमांक ४ ची व्यक्ती ( मार्को पोलो ) क्रमांक ३ वर
क्रमांक १ ची व्यक्ती ( कुतुबुद्दीन ऐबक ) क्रमांक ४ वर



# ओळखा पाहू !

वरील फोटोसंबंधी खाली अ, ब आणि क मध्ये काही विधाने दिलेली आहेत. त्यांपैकी प्रत्येकातील एकेक विधान वरील व्यक्तीसंबंधी आहे.

आता ओळखा पाहू नेमकी ही व्यक्ती आणि या व्यक्तीसंबंधीची विधाने !

या विधानांची उत्तरे या खालीच दिलेली आहेत. तथापी ती आधी पाहण्याचा मोह टाळा. स्वतः प्रामाणिक प्रयत्न करा ! तुमची उत्तरे तयार झाली म्हणजे मगच आम्ही दिलेली उत्तरे पाहा.

[ अ ] ( १ ) रणजितसिंह ( २ ) बहाद्दुरशहा ( ३ ) नानासाहेब पेशवे ( ४ ) बाळाजी विश्वनाथ ( ५ ) तात्या टोपे

[ ब ] ( १ ) यांनी इ. स. १८०२ मध्ये अमृतसर जिंकले. ( २ ) मोंगलांचा शेवटचा बादशहा. ( ३ ) हा दुसऱ्या बाजीरावाचा दत्तक मुलगा. ( ४ ) छत्रपतींचा पहिला पेशवा. ( ५ ) १८५७ च्या संग्रामाचा सेनानी.

[ क ] ( १ ) यांचा मृत्यू इ. स. १८३९ मध्ये झाला. ( २ ) यांस इंग्रजांनी कैद करून हद्दपार केले. ( ३ ) हा नेपाळात भूमिगत झाला. ( ४ ) यांचा मृत्यू इ. स. १७२० मध्ये झाला. ( ५ ) याला इंग्रजांनी १८५८ मध्ये फाशी दिले.

उत्तर

( क + २ ) ( ब + २ ) ( अ + २ )

जेव्हा स्वतःचा किंवा स्वार्थाविषयीचा
कोणताही विचार मनुष्याच्या मनाला शिवत नाही
तेव्हाच त्याच्या हातून सर्वोत्कृष्ट कार्य घडते.
त्याचा सर्वांवर अधिक प्रभाव पडतो.
तो प्रशंसनेला पात्र ठरतो.

खरा उद्योगी मनुष्य आपले सामर्थ्य,
उत्साह आणि परिश्रम
आपल्या कामात ओततो.
आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा,
अभिमान, लालसा त्यात आणीत नाही.
आपल्या लहानशा व्यक्तित्वापेक्षा
काहीतरी उच्च गोष्ट नेहमी त्याच्या दृष्टीसमोर असते
आणि त्या गोष्टीशी एकनिष्ठ व आज्ञाधारक राहणे
हे त्याच्या व्यवहाराचे सूत्र असते.

—श्री अरविंद


एकदा काय झालं ! आमच्या कार्यालयाच्या सौ. राजस प्रभू या बाजारात गेल्या. बाजारातून घरी परत येताना एका मिठाईच्या दुकानापाशी एका थाळीत सुंदर बर्फी मांडलेली त्यांना दिसली. दुकानदाराजवळ त्यांनी त्या बर्फीचा नमुना मागितला. त्यांना ती बर्फी फारच आवडली व त्या थाळीतील सगळे बर्फीचे तुकडे विकत घेण्याचे त्यांनी ठरविले आणि दुकानदाराला विचारले, " काय हो, किती आहेत हे बर्फीचे तुकडे ? "

त्या दुकानदाराने ते तुकडे अशा रीतीने मांडून ठेवले होते, की ते नेमके मोजणे मोठ्या कौशल्याचे काम होते.

त्याच थाळीतील तुकडे समोरच्या चित्रात तुमच्यापुढे ठेवले आहेत.

सौ. राजस प्रभू यांनाही ते तुकडे नेमके किती हे त्यावेळी मोजता आले नाहीत. तुम्ही प्रयत्न करा. चित्रातील थाळी उभी-आडवी फिरवा आणि नेमके तुकडे किती ते मोजा पाहू !

[ एकूण १३ तुकडे ]





## पाहू बरे तुमचे ज्ञान !

वरील जहाजासंबंधी खाली अ, ब, क मध्ये काही विधाने दिली आहेत. त्यांपैकी प्रत्येकी एक विधान या जहाजातून प्रवास केलेल्या व्यक्तीसंबंधी आहे.

आता ओळखा पाहू ती व्यक्ती आणि त्या व्यक्तीसंबंधी केलेली विधाने !

[ अ ] वरील जहाजातून याने प्रवास केला. ( १ ) मार्को पोलो ( २ ) कोलंबस ( ३ ) वास्को-द-गामा ( ४ ) मॅगेलन ( ५ ) हेन्री हडसन.

[ ब ] ( १ ) याने चीनला जाणारा जलमार्ग शोधला. ( २ ) याने अमेरिकेचा शोध लावला. ( ३ ) याचा जन्म १४६० मध्ये झाला. ( ४ ) १० ऑगस्ट १५१९ रोजी याने आपली मोहीम सुरू केली. ( ५ ) याने मॅनहॅटन या बेटाचा शोध लावला.

[ क ] ( १ ) हा चोवीस वर्षांनी व्हेनिसला परत आला. ( २ ) याने 'सांत मरिया' बोटीने प्रवास केला. ( ३ ) याने इ. स. १४९७ च्या जुलै महिन्यात हिंदुस्थानच्या शोधाची मोहीम सुरू केली. ( ४ ) २७ एप्रिल १५२१ रोजी हा मरण पावला. ( ५ ) याने शोधून काढलेल्या बेटाचे नाव नंतर न्यूयॉर्क असे ठेवण्यात आले.

उत्तरे

अ २, ब २, क २

# अशी आहे आपली भारतीय रेल्वे

१. भारतीय रेल्वे आशियात सर्वांत मोठी आहे. जगात तिचा सहावा क्रमांक लागतो. रोज सुमारे १०,००० गाड्या ७०,००० स्टेशने घेतात. रेल्वेला मिळणाऱ्या उत्पन्नातील ९९ टक्के उत्पन्न तिसऱ्या वर्गाच्या ( हल्लीचा दुसरा वर्ग ) प्रवाशांकडून मिळते.

२. आपल्या रेल्वेच्या सर्व प्रवासी गाड्यांचे डबे एकमेकांस जोडले तर १२५ मैल लांबीची एक मोठी गाडी तयार होईल.

३. दररोज सुमारे ६० लाख प्रवासी रेल्वेने प्रवास करतात.

४. आपल्याकडे पहिली तुफानी वेगाची एक्स्प्रेस गाडी १९६९ मध्ये सुरू झाली. ही गाडी ३ मार्च १९६९ रोजी दिल्ली ते हावरा या मार्गावर धावली. या गाडीचा वेग ताशी १२० मैल आहे.

५. रेल्वेचा सर्वांत मोठा पूल 'सोन ब्रिज' हा आहे. याची लांबी १०,०५२ फूट आहे. यात एकूण ९५ कमानी आहेत. प्रत्येक कमान १०० फूट अंतरावर आहे.

६. दररोज ८५·३१ टक्के प्रवासी गाड्या 'इन टाइम' स्टेशनवर पोहोचतात.

७. पहिला एअरकंडिशंड प्रवासी डबा १९३७ साली मुंबई ते दिल्ली या मार्गावरील गाडीला जोडला गेला.

८. सर्वांत लांब प्लॅटफॉर्म सोनपूर स्टेशनचा आहे. तो २,४१५ फूट लांब आहे. हे स्टेशन बिहार प्रांतात आहे.

# चित्र पूर्ण करा

या समोरच्या पानावर तुमच्यासाठी जिराफाची दोन अपूर्ण चित्रे दिली आहेत.


आपण ती पूर्ण करा.

मात्र एक गोष्ट लक्षात ठेवा.

समोरील दोन्ही चित्रांचे भाग एकमेकांस जोडले की फक्त एकच जिराफ तयार होतो.

पण आपण स्वतः चित्रकार बनलात तर मात्र सुंदर दोन चित्रे तयार होतील.

मग जमेल ना हे तुम्हाला ?



# गुणाची पारख



एक प्रसिद्ध चित्रकार एका मोठ्या माणसाचे शिफारसपत्र घेऊन नेपोलियनकडे गेला. त्याचा गबाळा पोशाख पाहून नेपोलियनचे त्याच्याविषयी प्रथमदर्शनी फारसे चांगले मत झाले नाही. त्याने त्यास बसण्यास सांगितले व तो आपल्या कामास निघून गेला. काम आटोपल्यावर तो बऱ्याच वेळानंतर परत आला. तोपर्यंत तो चित्रकार तसाच ताटकळत बसून होता. चित्रकारही मनातून अस्वस्थ झाला होता. नेपोलियनने त्याच्याशी जरा नाखुषीनेच बोलण्यास सुरुवात केली. पण त्याच्याशी बोलताना त्याची प्रखर बुद्धिमत्ता, चित्रकलेतील त्याचे असामान्य ज्ञान पाहून नेपोलियन प्रभावित झाला. चित्रकाराला निरोप देताना नेपोलियन स्वतः त्यास दारापर्यंत पोचविण्यास गेला. ते पाहून चित्रकार आश्चर्याने म्हणाला, "मी आलो तेव्हा आपण माझ्याकडे धड पाहिले देखील नाही; आणि आता पाहावे तर आपण स्वतः दारापर्यंत मला पोहोचविण्यास येत आहात, हे कसे?"

नेपोलियन हसून म्हणाला, "मित्रा, त्याचे असे आहे, येताना मनुष्याचा जो सत्कार करतात तो त्याच्या पोशाखावरून, जाताना जो सत्कार होतो तो त्याच्या गुणांवरून."

ठेच दोन तऱ्हांनी लागते. मुळीच न पाहिल्यामुळे किंवा फार दूर पाहात राहिल्यामुळे.

—विनोबा भावे

सर्प ज्याप्रमाणे जीर्ण त्वचा सोडतो, त्याप्रमाणे उत्पन्न झालेल्या क्रोधाला जो क्षमेने घालवतो तोच खरोखर पुरुष म्हटला पाहिजे.

—रामायण

हृदयाच्या मखमली पेटीत ठेवण्यासारखी दोन अक्षरे आहेत आणि ती म्हणजे " आई. "

—साने गुरुजी

जो मनुष्य तुमच्या चुका तुम्हांस दाखवतो त्याला पुरलेले द्रव्य दाखवणारा समजा.

—थोरो

विजय त्याचाच होतो की जो विजयी होण्यासाठी साहस करतो.

—पंडित नेहरू

नदी वाहून गेल्यावर पाय न भिजविता पलीकडे जाऊ, या मूर्खपणाच्या आशेवर थांबून न बसता, पाण्यात उतरून प्रवाह तोडून पलीकडे चला.

—स्वामी विवेकानंद

दयाहीन धर्म, विद्याहीन गुरू, क्रोधमुखी भार्या व स्नेहशून्य बंधुजन यांचा त्याग करणेच योग्य होय.

—महाभारत

कर्तव्य केल्याने होणारा आनंद हा त्रिभुवनातील सर्व आनंदापेक्षा फार उच्च व दीर्घकाळ टिकणारा असतो.

—महात्मा गांधी

सुखी तोच आहे ज्याला काम मिळाले. त्याने यापेक्षा दुसऱ्या सुखाची आशा करू नये.

—कार्लाइल

## सुंदर ससा : चित्र रंगवा

समोरच्या पानावर एका सुंदर सशाचे चित्र रंगविण्यासाठी दिले आहे. पण हे चित्र स्पर्धेसाठी नाही !

मात्र तुमच्या चित्रसंग्रहात भर पडावी, तुमच्या रंगसंगतीला पूर्ण वाव मिळावा या हेतूने हे चित्र दिले आहे.

तेव्हा तुमच्या आवडीच्या रंगांचा वापर करून हे सुंदर सशाचे चित्र रंगवा आणि आपल्या रंगीत चित्रसंग्रहात आणखी एका चित्राची भर घाला.





## ओळखा पाहू !

वरील व्यक्तीसंबंधी खाली अ, ब, क मध्ये काही विधाने दिली आहेत. त्यांपैकी प्रत्येकातील एक विधान त्या व्यक्तीसंबंधी आहे.

आतां ओळखा पाहू ती व्यक्ती आणि त्या व्यक्तीसंबंधी केलेली विधाने !

[ अ ] ( १ ) तैमूरलंग ( २ ) महंमद तुघ्लख ( ३ ) नासिरुद्दीन ( ४ ) महंमद घोरी ( ५ ) अल्लाउद्दीन खिलजी.

[ ब ] ( १ ) याचा मृत्यू उठ्ठा येथे १३५१ मध्ये झाला. ( २ ) इ. स. १२६६ मध्ये याचा मृत्यू झाला. ( ३ ) हा एका पायाने लंगडा होता. ( ४ ) याने इ. स. ११५० मध्ये गझनी जिंकले. ( ५ ) हा इ. स. १२९६ मध्ये चुलत्याचा खून करून गादीवर बसला.

[ क ] ( १ ) याचे मूळ नांव ' महंमद-बिन-साम ' असे होते. ( २ ) याने स्वतंत्र अर्थशास्त्र बनविले होते. ( ३ ) हा कुराणाच्या प्रती विकून आपला उदरनिर्वाह करीत असे. ( ४ ) याने चितोड जिंकले. ( ५ ) याची दिल्लीवर १७–१२–१३९८ रोजी धाड आली.

उत्तर

अ – ४, ब – ४, क – १

[ ख्रिश्चन धर्माचा प्रवर्तक जीझस ख्राइस्ट याचा जन्म पॅलेस्टाईनमधील बेथेलहेम या गावी झाला. जीझसला लहानपणापासून एकांताची व चिंतनाची आवड होती. त्याच्या थोर विचारांचा काही सारांश खाली दिला आहे. ]

**जे नम्र व लीन आहेत ते धन्य होत !**
**कारण ते पृथ्वीचे राज्य मिळवतील.**

**जे दयाशील आहेत ते धन्य होत !**
**कारण त्यांच्यावर देव दया करील.**

**जे अंतःकरणाचे शुद्ध आहेत ते धन्य होत !**
**कारण त्यांना प्रभू दिसेल.**

**शपथ वाहू नका.**

**स्वर्ग हे देवाचे सिंहासन आहे म्हणून त्याची शपथ वाहू नका.**

**पृथ्वी हे त्याचे पदासन आहे.**
**म्हणून तिचीही शपथ वाहू नका.**

**इतकेच काय पण स्वतःच्या मस्तकाचीही शपथ वाहू नका.**

**कारण मस्तकावरील एक केसही**
**तुम्हांला काळा किंवा पांढरा करता येणार नाही.**

## शर्यत जिंकून हा कप कोण मिळवणार ?

ही पळण्याची शर्यत सुरू आहे.


या शर्यतीत पहिल्या क्रमांकाने विजय मिळविणाऱ्यासाठी हा खास कप ठेवला आहे.

प्रथमतः या शर्यतीत पुष्कळच मुलांनी भाग घेतला होता. पण सर्वांत शेवटी हे दोघेच त्यांना मागे टाकून पुढे आले आहेत.

आता प्रश्न आहे तो एवढाच की, या दोघांपैकी कप कोण जिंकणार ?

तुमच्याप्रमाणेच आम्हांलाही ते माहीत नाही.

कोण जिंकणार ते तुम्हीच शोधून काढा ना ?


1
2

****************

# तुमचे सामान्यज्ञान

****************

[ पुढीलपैकी आठ प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्यज्ञान बरे, दहांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्कृष्ट समजावे. ]

( १ ) अलाहाबादमधील पूर्वीच्या ऑलफ्रेड पार्कमध्ये........या क्रांतिवीरावर गोळ्या झाडून त्याला यमसदनी पाठविण्यात आले.

( अ ) सचींद्रनाथ संन्याल, ( ब ) बटुकेश्वर दत्त. ( क ) राजेंद्रलाल लाहिरी, ( ड ) चंद्रशेखर आझाद.

( २ ) पंजाब राज्यातील लोकनृत्यास.......म्हणतात.

( अ ) कथाकली, ( ब ) भांगडा, ( क ) रास, ( ड ) घुमर.

( ३ ) इजिप्तमधील लोक......या प्राण्याची पूजा करतात.

( अ ) शेळी, ( ब ) घोडा, ( क ) गाढव, ( ड ) पोपट.

( ४ ) हवामानदर्शक यंत्राचा शोध लागण्यापूर्वी वादळी हवा चटकन समजण्यासाठी म्हणून........उपयोग करीत असत.

( अ ) जळवांचा, ( ब ) मुंग्यांचा, ( क ) मोरांचा, ( ड ) सशांचा.

( ५ ) लांबी मोजण्याचे ‘ यार्ड ’ हे अधिकृत परिमाण म्हणून इंग्लंडचा राजा........ याने प्रथम ठरवून दिले.

( अ ) पहिला हेन्री, ( ब ) पहिला चार्ल्स, ( क ) पहिला जॉर्ज, ( ड ) पहिला एडवर्ड.

( ६ ) .......या परदेशी पहिलवानाने कितीतरी भारतीय चित्रपटांमधून भूमिका केलेल्या आहेत.
( अ ) ॲसिरटी, ( ब ) गोल्डस्टाईन, ( क ) किंगकाँग, ( ड ) रेड स्कॉर्पियन.

( ७ ) महाराष्ट्रात सर्वांत अधिक पाऊस........येथे पडतो.
( अ ) माथेरान, ( ब ) महाबळेश्वर, ( क ) मलकापूर, ( ड ) मालेगाव.

( ८ ) कोणत्याही फळापेक्षा जास्त साखर........असते.
( अ ) आंब्यात, ( ब ) द्राक्षात, ( क ) केळ्यात, ( ड ) अंजिरात.

( ९ ) प्रार्थनेसाठी एका वेळी एक हजार लोक सहज बसू शकतील असे कागदी देऊळ.......मध्ये आहे.
( अ ) कॅनडा, ( ब ) स्पेन, ( क ) नॉर्वे, ( ड ) डब्लिन.

(१०) पूर्ण गोलाकृती चेहरा असणाऱ्याचा स्वभाव........असतो.
( अ ) भांडखोर, ( ब ) अतिशय लहरी, ( क ) बराचसा गूढ, ( ड ) फार गरीब.

(११) ' सुसंगति सदा घडो । सुजनवाक्य कानी पडो । कलंक मतिचा झडो । विषय सर्वथा नावडो ॥ ' हे यांच्या काव्यातील चरण होत.
( अ ) वामनपंडित, ( ब ) मुक्तेश्वर, ( क ) मोरोपंत, ( ड ) दासोपंत.

(१२) ........मुनीने एका आचमनात समुद्र प्राशन करून टाकला आणि सागराचे गर्वहरण केले, अशी कथा आहे.
( अ ) अगस्ती, ( ब ) अत्री, ( क ) काश्यप, ( ड ) गौतम.

**उत्तरे**

( १ ) – ड, ( २ ) – ब, ( ३ ) – क, ( ४ ) – अ, ( ५ ) – अ, ( ६ ) – ब, ( ७ ) – ब, ( ८ ) – ब, ( ९ ) – क, ( १० ) – क. ( ११ ) – क, ( १२ ) – अ.

## चित्र रंगवा

हा बघितलात का जंगलचा राजा कसा रुबाबात उभा आहे तो ! अरे, पण घाबरलात कशाला ? तो काही खरा नाही. हे तर आहे त्याचे चित्र.

आता तुम्ही काय करायचं की खऱ्याखुऱ्या सिंहाला शोभतील असे रंग निवडायचे आणि सिंह अगदी हुबेहूब रंगवून काढायचा.

चित्र पूर्ण झालं की हळूच आईला चित्र दाखवा आणि सिंहासारखी मोठ्ठी डरकाळी फोडा. बघा आई घाबरते की नाही !

बरं चला हं ! करा रंगवायला सुरुवात.



बल हेच जीवन होय, दुर्बलता म्हणजे मृत्यू.
बल हाच परम आनंद होय,
शाश्वत व अमर जीवन होय.
दुर्बलता म्हणजे सतत भार,
सतत चिंता, सतत दुःख होय;
दुर्बलता म्हणजे मृत्यू.

या जगातील समस्त दुःखांचे कारण
म्हणजे दुर्बलता हेच होय.
आपण शक्तिहीन आहोत म्हणूनच आपल्याला
दुःख भोगावे लागते.
दुर्बलतेमुळेच आपण खोटे बोलतो,
चोरी करतो, हत्या करतो,
व इतर गुन्हे करतो.

दुर्बलतेमुळेच आपण दुःखाच्या खाईत पडतो.
जिथे दुर्बल बनविणारी कोणतीच गोष्ट नाही
तिथे दुःख कुठले ?

बल हीच एकमात्र आवश्यक गोष्ट होय.
म्हणूनच युवकांनो, बलसंपन्न व्हा, धीट व्हा.
व तुम्हीच स्वतःचे भविष्य घडवा.

*—स्वामी विवेकानंद*

# भारतातील काही ठळक नोंदी

| इ. स. पूर्वी | |
|---|---|
| ४००० | सिंधूच्या खोऱ्यातील संस्कृती |
| ३१००-१००० | वेदांची रचना |
| ५६३-४८३ | गौतम बुद्ध |
| ६४२-३६४ | शिशुनागांची सत्ता |
| ५४४-४९३ | बिंबिसाराची सत्ता |
| ५३९ | महावीर जन्म |
| ५०० | दरायसची सिंधवर स्वारी |
| ४९३-४६२ | अजातशत्रूची सत्ता |
| ३६४-३२४ | नंद घराण्याची सत्ता |
| ३२७ | शिकंदराची भारतावर स्वारी |
| ३२५-३०० | चाणक्याचे अर्थशास्त्र |
| ३२१-१८७ | मौर्य घराण्याची सत्ता |
| ३२१-२९८ | चंद्रगुप्ताची सत्ता |
| २९८ | चंद्रगुप्ताचा राज्यत्याग |
| २७३-२३२ | अशोकाची सत्ता |
| २६१ | कलिंगयुद्ध |
| २४०-२३० | आंध्रांचा उदय |
| १८७-१७३ | शुंग राजांची सत्ता |
| १६०-१५० | मिलिंदाचे राज्य |

| इ. स. नंतर | |
|---|---|
| ७८ | शालिवाहन शकाची सुरुवात |
| १०६-१३० | गौतमी शातकर्णी राजा |
| १३०-१५८ | पुलुमायी शालिवाहन |
| १५० | काश्मिरात कनिष्कांचे राज्य |
| ११९-१६७ | नहपान राज्याची सत्ता |
| १५६-१७९ | कनिष्कांची सत्ता |
| २५० | आंध्रांची अखेर |
| ३३०-३७५ | समुद्रगुप्त |
| ३८० | विक्रमादित्य राज्यावर |
| ३९५ | विक्रमादित्याने ग्रीकांचा पराभव केला |
| ३९९-४१४ | फा-हेनची भारतयात्रा |
| ४७६ | आर्यभट्ट |
| ५००-५५० | कालिदास, वररुची |
| ५८३ | प्रभाकरवर्धन राजा |
| ६०६-६४७ | सम्राट हर्षवर्धन सत्ता |
| ६०८-६४३ | दुसरा पुलकेशी |
| ६१० | राजा भर्तृहरी |
| ६२५ | पुलकेशीचा वकील इराणकडे |
| ६४१ | हर्षाचे चीनकडे शिष्टमंडळ |
| ६३०-६४५ | ह्यू-एन-त्संगची भारत-यात्रा |
| ६५०-७०० | कुमारीलभट्ट |

## बिट्टूला वाट दाखवा


हज्जार वेळा सांगूनसुद्धा बिट्टूला हे कधीही पटले नाही की एकट्याने लांब फिरायला घर सोडून जाऊ नये!

हट्टी बिट्टू पुन्हा घराबाहेर पडलाच. आणि फिरत फिरत भलत्याच ठिकाणी जाऊन उभा राहिला!

शेवटी पोटाला भूक लागली आणि मग मात्र बिट्टूला घराची आठवण झाली. पण तोपर्यंत तो घराची वाट विसरला. आता त्याला घरापर्यंत पोहोचविण्याची कामगिरी तुम्हांला पार पाडावी लागणार आहे.

मग पोहोचवा ना त्याला त्याच्या घरी!

या अनेक पायवाटांतून त्याच्या घराची वाट तुम्ही त्याला दाखवाच!



## तुमचे सामान्यज्ञान

[ पुढीलपैकी आठ प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्यज्ञान बरे, दहांची बरोबर देता आल्यास उत्तम आणि सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्कृष्ट समजावे. ]

( १ ) भारतात खेळाच्या साहित्याचे उत्पादन .......... राज्यात होते.

( अ ) ओरिसा, ( ब ) पंजाब, ( क ) मद्रास, ( ड ) मध्यप्रदेश

( २ ) गोविंदराव टेंबे हे प्रख्यात .......... होते.

( अ ) नर्तक, ( ब ) चित्रकार, ( क ) पेटीवादनपटू,
( ड ) क्रिकेटपटू.

( ३ ) भारतातील पहिल्या प्रतीची वेधशाळा .......... येथे आहे.

( अ ) कोडाईकनाल, ( ब ) कोकोनाडा, ( क ) कोईमतूर
( ड ) कोझीकोडे.

( ४ ) पृथ्वीवरचे उष्णतामान .......... अंश फॅरनहीट झाले की पृथ्वीवरच्या साऱ्या पाण्याची उकळून वाफ होईल.

( अ ) २१०, ( ब ) २१३, ( क ) २१५, ( ड ) २०७.

( ५ ) जपानी लोक शेगडीला .......... म्हणतात.

( अ ) हिबाची, ( ब ) सायोनारा, ( क ) किमोने, ( ड ) फुजियामा.

( ६ ) .......... झाड पृथ्वीवर प्रथम उत्पन्न झाले म्हणून त्यास आदिरोह असे म्हणतात.

( अ ) आंब्याचे, ( ब ) आवळ्याचे, ( क ) अननसाचे,
( ड ) अडुळशाचे.

(७) ..............ही जगातील सर्वांत मोठी नदी होय.

(अ) अमेझॉन, (ब) मिसिसिपी, (क) नाईल, (ड) गंगा.

(८) श्रीखंडोबाचे दर्शन घ्यावयाचे असेल तर तुम्हांस ................ येथेच गेले पाहिजे.

(अ) जयपूर, (ब) जयगड, (क) जेसलमीर, (ड) जेजुरी.

(९) पोट व छाती यांच्या दरम्यानचा एक लवचिक पडदा उत्तेजित झाल्यास त्यामुळे................

(अ) जांभई येते, (ब) उचकी येते, (क) खोकला येतो, (ड) शिंक येते.

(१०) 'स्वेथलिंग कप'चा संबंध...............या खेळाशी जोडला जातो.

(अ) वॉटरपोलो, (ब) हॉकी, (क) टेबल टेनिस, (ड) पिंगपाँग.

(११) पित्ताची मात्रा म्हणून...............हे आयुर्वेदीय औषध प्रसिद्ध आहे.

(अ) सूतशेखर, (ब) अभ्रलोह, (क) प्रवाळभस्म, (ड) शिलाप्रवंग.

(१२) मराठीतील ख्यातनाम लावणीकार म्हणून .............. यांचेच नाव घेतले जाते.

(अ) दिवाकर, (ब) कवी माधव, (क) माधव ज्यूलियन, (ड) सगनभाऊ.

**उत्तरे**

(१) ब, (२) क, (३) अ, (४) ब, (५) अ, (६) ब, (७) ब, (८) ड, (९) ब, (१०) क, (११) अ, (१२) ड.


## आपणही चित्रकार व्हा !

हे चार चेहरे पाहिलेत ? यातील एका चेहेऱ्यावर सर्व बारकावे आहेत. बाकी बारकावे, त्या त्या चेहेऱ्यांवर आता मुळीच दिसत नाहीत. खरे ना !

अहो, हेच काम तर तुम्हांला करावयाचे आहे. या चेहेऱ्यांचे बाह्य स्वरूप पाहिले की त्यातील बारकावे कसे असले पाहिजेत याचा अंदाज तुम्ही सहज करू शकाल ! आणि हा अंदाज बरोबर ठरला की त्याप्रमाणे त्या चेहेऱ्यांतील बारकावे काढण्यास सुरुवात करा !

हे तीनही चेहरे वेगवेगळ्या वयाच्या, वेगवेगळ्या प्रवृत्तीच्या, माणसांचे आहेत हे नीट समजावून घ्या !

आणि त्या चेहेऱ्यांतील बारकावे काढून चेहरे पूर्ण करा.



# जगातील काही प्रमुख वाळवंटे

| | वाळवंट व देश | क्षेत्रफळ ( मैलांत ) |
|---|---|---|
| १ | सहारा ( उ. आफ्रिका ) | ३,५००,००० |
| २ | लिबियन ( उ. आफ्रिका ) | ६५०,००० |
| ३ | ग्रेट ऑस्ट्रेलियन ( प. ऑस्ट्रेलिया ) | ६००,००० |
| ४ | अरेबिअन ( अरेबिया ) | ५००,००० |
| ५ | गोबी ( मंगोलिया ) | ४००,००० |
| ६ | रूबल खाली ( अरेबियाचा भाग ) | २५०,००० |
| ७ | ग्रेट सँडी ( ऑस्ट्रेलियाचा भाग ) | १६०,००० |
| ८ | ग्रेट व्हिक्टोरिया ( ,, ) | १२५,००० |
| ९ | सिरियन ( अरेबियाचा भाग ) | १२५,००० |
| १० | टॅक्ला मॅकॅन ( चीन ) | १२५,००० |
| ११ | ॲरुंटा ( ऑस्ट्रेलियाचा भाग ) | १२०,००० |
| १२ | काराकुम ( रशिया ) | १०५,००० |
| १३ | न्युबियन ( सहाराचा भाग ) | १००,००० |
| १४ | थर ( वायव्य भारत ) | १००,००० |
| १५ | किझिल कुम ( रशिया ) | ९०,००० |



# भारताबाहेरील काही ठळक नोंदी

| | इ. स. पूर्वी |
|---|---|
| सुमेरियन संस्कृती | ४५०० |
| इजिप्तमधील वर्णलिपी | ३५०० |
| इजिप्तमध्ये मोठे मनोरे | ३०००–१८०० |
| फु-हे या चीनच्या राजाचे राज्य | २८५२–२७३७ |
| पॅलेस्टाईनवर इजिप्तचा अंमल | २७००–२४६६ |
| चीनमध्ये लेखनकला ज्योतिषशास्त्रप्रयोग | २६९७–२५९७ |
| चीनचा राजा इआओ | २३५७ |
| अब्राहमची कारकीर्द | २२५०–२१०० |
| असिरियन राजधानी निनेव्हे स्थापना | २२४५ |
| हम्मुरबीची कारकीर्द | २१२३–२०८१ |
| ग्रीसचे इतिहासपूर्व युग सुरू | १६०० |
| मोझेसचा जन्म | १५७१ |
| फिनिशियाची भारतावर स्वारी | १५३५ |
| ट्रॉय शहराची स्थापना | १३७४ |
| इजिप्तचा तुतेनखामेन | १३६०–१३५० |
| दुसरा ऱ्हामसेस | १३००–१२३४ |
| ग्रीसच्या इतिहासपूर्व युगास प्रारंभ | १२०० |
| ट्रॉय शहर पडते | ११८४ |
| कांबुजचा पहिला चिनी उल्लेख | ११०९ |
| क्रीट्स् ऱ्होड्स येथे डोरियन लोकांच्या वसाहती | ११०४ |
| डेव्हिडची कारकीर्द | १०१०–९७० |
| बायबलातील सिरियाचे राज्य | १००० |
| इस्रायलचा सालोमन राजा | ९७० |
| दमास्कस स्वतंत्र होते | ९५० |

| | इ. स. पूर्वी |
|---|---|
| कार्थेजची स्थापना | ८१४–८१३ |
| ग्रीसमधील ऑलिंपिक स्पर्धा सुरू | ७७६ |
| रोमची स्थापना | ७४३ |
| रोमन सिनेटची स्थापना | ७५३–६७३ |
| अथेन्सची राजसत्ता नष्ट | ६८३ |
| बिझँटियम ( कॉन्स्टँटिनोपल ) स्थापना | ६६७ |
| झरतुष्ट्र | ६६०–५९० |
| दुसरे बॅबिलोन राज्य | ६०६–५३९ |
| कॉंगफूत्स | ५५१–४७९ |
| पर्शियाचा दरायस द ग्रेट | ५२१–४८५ |
| अथेन्स-पर्शिया युद्ध | ४९० |
| सॉक्रेटिस | ४७०–३९९ |
| पेरीक्लिस कारकीर्द | ४६१–४२९ |
| अलेक्झांडर दि ग्रेट | ३५६–३२३ |
| प्लेटो मृत्यू | ३४७ |
| प्यूनिक युद्धे | २६४–१४६ |
| हॅनिबल | २४७–१८२ |
| ज्यूलियस सीझर | १०२–४४ |
| येशू ख्रिस्त जन्म ८ किंवा ४ किंवा | १ |
| | **इ. स. नंतर** |
| ऑगस्टस सीझरचा मृत्यू | १४ |
| सेंट पॉलला देहान्त शिक्षा ६४ किंवा | ६७ |
| व्हेस्युव्हिअस ज्वालामुखी जागृत | ७९ |
| रोमन साम्राज्याचा उत्कर्ष | ११४ |
| ऑरिलियस् मार्कस | १२१–१८० |
| रोमच्या राज्यात ख्रिस्ती धर्मास मान्यता | ३१२ |
| रोमन साम्राज्याचा अंत | ४७६ |

# अधिक भूक कोणाला लागली आहे ?

समोरच्या चित्रात मांजर, कुत्रा, ससा व माकड दिले आहे.

त्यांच्यापैकी सर्वात जास्त भूक कोणाला लागली होती हे तुम्ही शोधून काढायचे आहे !

ज्याप्रमाणे हे भुकेलेले चेहरे तुमच्यासमोर आहेत त्याचप्रमाणे त्यांच्या खाण्याच्या वस्तूही त्यांच्यापुढेच आहेत. पण एक वस्तू मात्र त्या चौघांपैकी एकाने खाऊन गट्ट केलेली आहे.

आता प्रश्न एवढाच की, यांपैकी अधिक भूक ज्याला लागलेली होती त्याने आपला आवडता पदार्थ चटकन खाऊन टाकलेला आहे. आता ही अधिक भूक कोणाला लागली होती, हे शोधायचे कसे ?

फारच सोपे आहे ! तुम्हांला भूक लागल्यानंतर तुमचा चेहरा हसरा, आनंदी राहू शकतो काय ? बरे ! तुम्हांला भूक लागली म्हणजे तुम्ही तुम्हांला आवडणारीच वस्तू खाल !

होय ना ? मग झाले तर ! याचाच नीट विचार करा आणि द्या उत्तर लवकर.

उत्तर : मांजर



या अंधाऱ्या खोलीत तू कोणाची पूजा करीत आहेस ?
डोळे उघड आणि नीट निरखून पाहा
तू ज्याची पूजा करतोस तो देव इथे नाही
तो इथे गाभाऱ्यात नाही. मंदिरात नाही.
जिथे जमीन नांगरून शेतकरी शेती करीत आहेत,
जिथे मजूर बाराही महिने दगड फोडून रस्ता करीत आहेत
तो देव उन्हा–पावसात त्यांच्याबरोबर राबत आहे,
त्याचे हात धुळीने भरले आहेत,
देवाचे हात शेतातील चिखलाने भरले आहेत
चल उठ, लवकर उठ
तुझे कपडे फाटतील, धुळीने भरतील
ते फाटू देत, मळू देत
अंगातून घामाच्या धारा निघत असताना
काम करून, कष्ट करून दमला–भागला असताना
त्या प्रभूची भेट घे.

— रवींद्रनाथ टागोर

# जगातील काही उंच पर्वतशिखरे

| पर्वतशिखरे | देश | उंची ( फुटांत ) |
|---|---|---|
| १ एव्हरेस्ट | नेपाळ-तिबेट | २९,०२८ |
| २ गॉडविन-ऑस्टेन | भारत | २८,२५० |
| ३ कांचनगंगा | नेपाळ-सिक्कीम | २८,१४६ |
| ४ लॉहत्से–१ | नेपाळ-तिबेट | २७,९२३ |
| ५ मॅकॅल्यू–१ | नेपाळ-तिबेट | २७,८२४ |
| ६ लॉहत्से–२ | नेपाळ-तिबेट | २७,५६० |
| ७ धवलगिरी | नेपाळ | २६,८११ |
| ८ अन्नपूर्णा–१ | नेपाळ-भारत | २६,९२६ |
| ९ चो-ओयू | नेपाळ-सिक्कीम | २६,७५० |
| १० मॅन्सल्यू | नेपाळ | २६,७६० |
| ११ नंगा पर्वत | भारत | २६,६०० |
| १२ गॅशेरब्रम | भारत | २६,४७० |
| १३ गॉसिएंथान | तिबेट | २६,२९१ |
| १४ डिस्टेघिल | भारत | २५,८६८ |
| १५ हिमालचूली | नेपाळ | २५,८०१ |
| १६ न्यूपत्से | नेपाळ-तिबेट | २५,७२६ |
| १७ माशेरब्रम | भारत | २५,६६० |
| १८ नंदादेवी | भारत | २५,६४५ |
| १९ चोमी लोंझो | नेपाळ-तिबेट | २५,६४० |
| २० राकपॉशी | भारत | २५,५५० |
| २१ कॅमेट | भारत-तिबेट | २५,४४७ |
| २२ टिरिच मिर | अफगाणिस्तान | २५,४२६ |

## चित्र तयार करा

समोरच्या चित्रात १ ते २९ आकडे दिले आहत. ते १–२–३–४ या क्रमाने जोडावयास सुरुवात करा.


१–२९ पर्यंत सर्व आकडे जोडून झाले की एक चित्र पूर्ण होईल.

मग ते चित्र कोणाचे तयार झाले आहे ते पाहा.

व त्याप्रमाणे ते चित्र रंगविण्यास सुरुवात करा.

नुसते चित्र रंगवू नका ! तर ही छोटी मुलगीही पण छान रंगवा.

यामुळे तुम्हांस चित्रे काढावयाची सवय लागेल आणि रंगविण्याची सवय होईल. मग चला, करा सुरुवात.......!




## विचित्र प्राणी

हा प्राणी तुम्हांला कोणत्याही प्राणिसंग्रहालयात दिसणार नाही. सुहास प्रभुला एकदा लहर आली आणि त्याने चित्र काढायला घेतले. पाहता पाहता एक विचित्र वाटणारा, जगाच्या पाठीवर अस्तित्वात नसलेला पण तुमच्या नित्य परिचीत अवयवांचा एक प्राणी आकाराला आला.

तुमच्या ओळखीच्या निरनिराळ्या प्राण्यांतून हा 'विचित्र प्राणी' तयार झाला आहे. कोणत्या प्राण्यांचे अवयव या प्राण्यांत आहेत ते तुम्ही सहज ओळखाल. जरा लक्षपूर्वक पाहा म्हणजे लपलेल्या प्राण्यांचे अवयव तुम्हांस दिसतील.

हरणाची शिंगे—कुत्र्याचे तोंड—जिराफाची मान—वाघाचे शरीर—घोड्याचे पुढील पाय—सिंहाचे मागील पाय—उंदराचे शेपूट.




## जादूच्या अजब पाट्या ( Magic Slates )



**दृश्य :** जादुगार हातात दोन कोऱ्या स्लेट पाट्या घेऊन स्टेजवर येतो व प्रेक्षकांना म्हणतो, "सन्मान्य बंधूंनो आणि भगिनींनो, माझ्या हातात ज्या या दोन पाट्या दिसतात, ज्या साध्यासुध्या पाटया नसून, जादूच्या अद्‌भुत पाटया आहेत. त्या मी तुम्हाला स्वच्छ पुसून दाखवितो. ( रुमालाने दोन्ही पाटया पुसून दाखवितो ) या पाटीवर तुम्हाला काहीही लिहिलेले दिसत नाही. पण माझ्या या जादूच्या कांडीच्या साह्याने तुम्हाला एका महान व्यक्तीचे नाव आलेले दिसेल. आपल्या देशातील सर्वांत महान व्यक्ती म्हणजे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी हे होत. त्यांची जन्मशताब्दीही नुकतीच साजरी झाली. तेव्हा त्यांचेच नाव मी या पाटीवर आणतो." असे म्हणून तो एका मुलाला त्या पाटया उंच धरावयास सांगतो व दुरून हातातील कांडीने, हवेतच "महात्मा गांधी" ही अक्षरे काढतो. नंतर पाटी उलगडून प्रेक्षकांना दाखवतो. पाटीवर "महात्मा गांधी" हे नाव वाचून प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करतात.

**खुलासा :** जादूगाराच्या हातात ज्या दोन पाट्या असतात, त्यांपैकी एका पाटीवर "महात्मा गांधी" हे नाव अगोदरच पांढऱ्या खडूने लिहून ठेवलेले असते. हे नाव दिसू नये म्हणून, पाटीच्या आकाराचा एक पातळ पत्रा त्या नाव लिहिलेल्या पाटीवर ठेवलेला असतो. त्यामुळे नाव झाकले जाते. या पत्र्याला काळा रंग दिलेला असल्यामुळे, तो प्रेक्षकांच्या मुळीच लक्षात येत नाही. जादुगार प्रथम जेव्हा पाटया पुसून दाखवितो, तेव्हा हा पत्रा त्या नाव लिहिलेल्या पाटीवर पडलेला असतो व जेव्हा जादुगार हवेत नाव लिहून पुन्हा पाटी उघडतो, तेव्हा तो पत्रा दुसऱ्या पाटीवर पडतो व प्रेक्षकांना नाव दिसू लागते. मात्र या प्रयोगासाठी खूप सराव करावा लागतो चुकून जर आतील पत्रा खाली पडला तर सर्वच बिंग बाहेर पडून, जादुगाराची फजिती होण्याचा फार संभव असतो.



# भारतातील काही ठळक नोंदी

७१२ महंमद-बिन कासीमची सिंधवर स्वारी
७८८–८२० आद्य शंकराचार्य
१००१ गझनीच्या महंमुदाची भारतावर पहिली स्वारी
१०२४ गझनीच्या महंमुदाची सोमनाथवर स्वारी
११५० भास्कराचार्य
११९१ पृथ्वीराजने महंमद घोरीचा पराभव केला.
११९३ महंमद घोरीने पृथ्वीराजला ठार केले.
१२३९ सुलतान रझियाचा वध
१२९० गुलाम वंशाचा शेवट
१२९४ अल्लाउद्दीनाची देवगिरीवर स्वारी
१३०४ अल्लाउद्दीनाने चितोड जिंकले
१३१२ देवगिरीचे राज्य मोडले
१३३६ विजयनगरची स्थापना
१३४७ बहामनी राज्याची स्थापना
१३९८ तैमूरलंगची दिल्लीवर स्वारी
१४८१ महमूद गवानचा वध
१४९८ वास्को-ड-गामा कालीकत बंदरात उतरला
१५१० अल्बुकर्कने गोवे जिंकून घेतले
१५२६ बहामनी राज्याच्या पाच शाखा
१५२६ पानिपतची पहिली लढाई : बाबर दिल्लीच्या तक्तावर
१५३० कृष्णदेवराय याचा मृत्यू
१५३८ गुरू नानक यांचा मृत्यू
१५४० शेरशहाने दिल्लीचे राज्य घेतले
१५५६ पानिपतची दुसरी लढाई
१५६५ विजयनगरचा अस्त
१५७६ हळदीघाटची लढाई
१५८२ अकबराचा “ दिने-इलाही ” धर्म
१५९७ राणा प्रताप मृत्यू
१६०५ अकबराचा मृत्यू
१६०८ कॅप्टन हॉकिन्स जहांगीर बादशहाच्या दरबारात
१६११ नूरजहानचा जहांगिराशी विवाह
१६१२ सुरत येथे इंग्रजांची पहिली वखार
१६३० शिवाजीमहाराजांचा जन्म
१६५९ अफझलखानाचा वध
१६८० शिवाजीमहाराजांचा मृत्यू
१७३७ बाजीरावाची दिल्लीवर स्वारी
१७३९ नादिरशहाची दिल्लीवर स्वारी
१७६१ पानिपतचे तिसरे युद्ध
१७७१ दिल्लीचा कारभार मराठ्यांच्या हाती
१७७२ थोरल्या माधवरावांचा मृत्यू
१७७३ नारायणरावांचा खून
१७९४ महादजी शिंदे यांचा मृत्यू
१८०० नाना फडणीस यांचा मृत्यू
१८०२ वसईचा तह
१८१८ पेशवाई खालसा
१८४८ साताऱ्याचे छत्रपतींचे राज्य खालसा


# इंग्रजी वाक्प्रचार पूर्ण करा.

सगळ्या गोष्टी वेळेवर करणे याला फार महत्त्व आहे. आता वेळेचे महत्त्व तुम्हीही जाणताच.

हे महत्त्व, निरनिराळ्या भाषांतील निरनिराळ्या वाक्प्रचारांतून पटवून देण्याचा प्रयत्न अनेकांनी केलेला आहे.

इंग्रजी भाषेत तर असे अनेक वाक्प्रचार आहेत. त्यांपैकी तीन आम्ही समोरच्या पानावर दिले आहेत. पण ते अपूर्ण आहेत. ते तुम्ही पूर्ण करावयाचे आहेत. हे वाक्प्रचार पूर्ण करा आणि स्मरणात ठेवा ! हे तुम्हांस आयुष्यभर उपयोगी पडतील.

ONCE　IN　A WHILE
NOW　OR　NEVER
SOONER　OR　LATER



SOONER OR ________

NOW OR ________

ONCE IN A ________



## स्पेलिंगप्रमाणे पत्ते आणणे

**दृश्य** : जादूगार हातात एक पत्त्याचा कॅट घेऊन येतो व प्रेक्षकांना म्हणतो, "मी आता इंग्रजी आकड्यांच्या स्पेलिंगप्रमाणे (म्हणजे ओ, एन, ई, वन्; टी, डब्ल्यू, ओ, टू; याप्रमाणे) पत्ते काढून दाखवितो." असे म्हणून तो ओ, एन, ई याप्रमाणे तीन पत्ते खाली घेतो. त्याबरोबर चवथा पत्ता एक आलेला दिसतो. या प्रमाणे तो राजापर्यंत स्पेलिंगप्रमाणे पत्ते काढून दाखवितो व प्रेक्षकांना चकित करतो.





**खुलासा** : मुलांनो, हा प्रयोग अगदी सोपा असून तो तुम्ही घरी किंवा कोठेही करू शकता. मात्र यासाठी इंग्रजी १ ते १० आकड्यापर्यंतचे स्पेलिंग अगदी तोंडपाठ पाहिजे. या प्रयोगात बदामचे किंवा चौकटचे १३ पत्ते घ्यावेत व ते पुढील क्रमाप्रमाणे लावावेत :

३. ८, ७, १, राणी, ६, ४, २, गुलाम, राजा १०, ९, ५. याप्रमाणे पत्ते लावून स्पेलिंगप्रमाणे पत्ते काढता येतात.

# भारताबाहेरील काही ठळक नोंदी

| | |
|---|---|
| महंमद पैगंबराचा जन्म | ५७० |
| ग्रेगरी पोप | ५९० |
| हिजरी सन सुरू | ६२२ |
| महंमद पैगंबराचा मृत्यू | ६३२ |
| मुसलमानांनी जेरूसलेम जिंकले | ६३४ |
| अरबांनी इजिप्त जिंकले | ६३९–६४१ |
| खलीफांची कारकीर्द | ६३२–६६१ |
| संपूर्ण स्पेन अरबांच्या सत्तेखाली आला | ७११ |
| चार्लस मार्टेलने मुसलमानांचा पराभव केला | ७३२ |
| बगदाद शहराचा उदय | ७५० |
| शार्लमन राजा | ७७१–८१४ |
| अरबस्तानात रुग्णालय | ९१८ |
| इतिहासकार अल्बेरूणी मृत्यू | १०३० |
| गझनीच्या महंमुदाचा मृत्यू | १०३० |
| सेल्जुक तुर्कांचा काळ | १०३७–१३०० |
| धर्मयुद्धांची सुरुवात | १०९५ |
| महंमद घोरीने गझनी जिंकली | ११५० |
| चंगीझखान | ११६३–१२२७ |
| होकायंत्राचा शोध | १२०० |
| गझनीचे राज्य मोडले | १२०५ |
| चंगीझखानाचे चीनवर स्वामित्व | १२१५ |
| चंगीझखानाचा मृत्यू | १२२७ |
| ख्रिस्ती लोकांकडून जेरूसलेम गेले | १२४४ |
| कुब्लाईखानाची चीनमध्ये राजवट | १२५७ |
| पोलो बंधूंची चीन सफर | १२६० |
| इटालियन कवी डांटे | १२६५–१३२१ |
| धर्मयुद्धांची समाप्ती | १२९१ |
| रॉजर बेकनचा मृत्यू | १२९४ |
| बंदुकीच्या दारूचा शोध | १३५३ |
| तैमूरलंगाची भारतावर स्वारी | १३९८ |
| तैमूरलंगाचा मृत्यू | १४०५ |
| लिओनार्डो-द-व्हिंचीचा जन्म | १४५२ |
| गटेन्बर्गच्या छापखान्यात पहिले बायबल छापले | १४५६ |
| सर थॉमस मूर जन्म | १४७८ |
| कोपर्निकस | १४७३–१५४३ |
| जर्मन सुधारक मार्टिन ल्यूथरचा जन्म | १४८३ |
| कोलंबसचा अमेरिका शोध | १४९२ |
| वास्को-द-गामा भारतात | १४९८ |
| मार्टिन ल्यूथरचा विटेन्बर्ग जाहीरनामा | १५१७ |
| मॅगेलनची पृथ्वीप्रदक्षिणा | १५२१ |
| ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना | १६०० |
| गॅलिलिओची पहिली दुर्बिण | १६०९ |
| इंग्लंडचा राजा चार्लस शिरच्छेद | १६४९ |
| नेपोलियन बोनापार्ट | १७६९–१८२१ |
| जेम्स वॅटचे वाफेचे इंजिन | १७८५ |
| इंग्लंडमध्ये गुलामगिरी बंद | १८३३ |


# चेहरे आणि मुखवटे

समोरच्या चित्रात रजनी प्रभूने काढलेले तुम्हांला पाच चेहरे दिसत आहेत; पण ते पूर्ण नाहीत !

प्रत्येक चेहऱ्याची एक विशिष्ट प्रकारची ठेवण असते. त्यामुळे त्या चेहऱ्यांतील डोळे, नाक, भुवया, तोंड यांमध्ये नेहमीच वेगळेपणा असतो.

असा वेगळेपणा हा निरनिराळ्या प्रकारांमुळे असू शकतो व तो ओळखताही येतो.

आता हा वेगळेपणा शोधणे, सांगणे, वेगळे; आणि स्वतः ते चेहरे पूर्ण करणे वेगळे ! हे काम तुम्ही करावे या हेतूने आम्ही ही चित्रे तुमच्यासमोर ठेवली आहेत. करा पाहू हे चेहरे पूर्ण.



****************

# तुमचे सामान्यज्ञान

****************

[ पुढीलपैकी आठ प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्यज्ञान बरे, दहांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्कृष्ट समजावे. ]

( १ ) भारतातील सर्वात अधिक जमीन.......या पिकाच्या लागवडीखाली आहे.

( अ ) तांदूळ, ( ब ) गहू, ( क ) ऊस, ( ड ) कापूस.

( २ ) शिवाजी महाराजांच्या मातोश्रीचे नाव जिजाबाई, तसे महाराणा प्रतापच्या आईचे नाव.......होते.

(अ) जगराणीदेवी, (ब) जयवंतीबाई, (क) जोगमायादेवी, (ड) जिजीबाई.

( ३ ) चांदण्या रात्री........उजेड जितक्या लांबून दिसतो तितका दुसऱ्या कोणत्याही रंगाचा दिसत नाही.

( अ ) पांढरा, ( ब ) तांबडा, ( क ) हिरवा, ( ड ) पिवळा.

( ४ ) क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे.......हे जन्मस्थळ होय.

( अ ) शिरगाव, ( ब ) शिरपूर, ( क ) शिरढोण, ( ड ) शिरगोप्पी

( ५ ) 'लाल किल्ला' पाहावयाचा असेल तर तुम्हास.......येथेच गेले पाहिजे.

( अ ) फरुकाबाद, ( ब ) दिल्ली, ( क ) कलकत्ता, ( ड ) बनारस.

( ६ ) जमिनीवरून समुद्राकडे जो वारा वाहू लागतो त्यास.......असे म्हणतात.

( अ ) मोसमी वारा, ( ब ) मतलई वारा, ( क ) व्यापारी वारा, ( ड ) खारा वारा.

(७) ग्रीक लोकांच्या युद्धदेवतेला.......असे म्हणतात.

(अ) मार्स, (ब) जॅनस, (क) ज्युपिटर, (ड) व्हीनस.

(८) अ, ब व क ही तिन्ही जीवनसत्त्वे... ...यात भरपूर प्रमाणात असतात.

(अ) मुळा, (ब) गाजर, (क) लिंबू, (ड) टोमॅटो.

(९) ......या देशातल्या पैशाच्या नोटेवर इंद्रधनुष्यातील सर्व सात रंगांचा समावेश असतो.

(अ) आफ्रिका, (ब) बेल्जम, (क) कॅनडा, (ड) रशिया.

(१०) क्रांतिकाळातला शेवटचा प्रतापी पेशवा म्हणून......यांचे नाव घेतले जाते.

(अ) माधवराव, (ब) नानासाहेब, (क) बाजीराव,
(ड) बाळाजी विश्वनाथ.

(११) भारतीय दिनदर्शिकेप्रमाणे......हा वर्षाचा पहिला महिना होय.

(अ) फाल्गुन, (ब) चैत्र, (क) वैशाख, (ड) आश्विन.

### उत्तरे

(१)–अ, (२)–ब, (३)–ब, (४)–क, (५)–ब, (६)–ब, (७)–अ,
(८)–ड, (९)–ड, (१०)–ब, (११)–ब.

## मनन आणि चिंतन

☐ राजा उद्योगी असला म्हणजे चाकरही उद्योगी होतात. राजाच्या हातून दुर्लक्ष होऊ लागल्यास चाकरही दुर्लक्ष करतात व राज्याचा विघात करतात.


——चाणक्य

## फरक ओळखा !

अल्पोपहारासाठी पाहुणे येणार आहेत ! निरनिराळ्या तऱ्हेची फळे अगदी एकाच पद्धतीने दोन थाळ्यांमधून मांडायला सौ. सरोज प्रभूंकडून नोकराला सांगितले गेले. समोरच्या चित्रात त्याने सारख्या म्हणून मांडलेल्या दोन्ही थाळ्या आपल्याला दिसत आहेत.

नोकराने अगदी प्रामाणिकपणे असा प्रयत्न केला आहे की, दोन्ही थाळ्यांतील पदार्थ, त्यांची संख्या व वस्तूंची रचना सारखीच असावी.

पण तरी देखील त्याच्या हातून काही चुका झाल्याच आहेत. त्या कोणत्या हे शोधून काढण्याचे काम आम्ही तुमच्यावर सोपवीत आहोत.



*****************

# तुमचे सामान्यज्ञान

*****************

[ पुढीलपैकी आठ प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्तम समजावे. ]

( १ ) ........ हे आर्यांचे सर्वांत प्राचीन वाङ्मय होय.

( अ ) ऋग्वेद, ( ब ) यजुर्वेद, ( क ) सामवेद, ( ड ) अथर्ववेद.

( २ ) शीखांचा शेवटचा गुरू म्हणून ........ यांचे नाव घेतले जाते.

( अ ) गुरू नानक, ( ब ) फत्तेसिंग, ( क ) रणजितसिंह,
( ड ) गुरू गोविंदसिंग.

( ३ ) आय. सी. एस. परीक्षेत उत्तीर्ण झालेले पहिले भारतीय ........ हे होत.

( अ ) सत्येंद्रनाथ, ( ब ) आशुतोष मुकर्जी, ( क ) चिंतामणराव देशमुख,
( ड ) नेताजी सुभाषचंद्र बोस.

( ४ ) महाभारत ग्रंथाची रचना ........ केली.

( अ ) विश्वामित्रांनी, ( ब ) वसिष्ठांनी, ( क ) व्यासांनी, ( ड ) कालिदासांनी.

( ५ ) ........ हे भारतातील सर्वांत मोठे शहर होय.

( अ ) आग्रा, ( ब ) बनारस, ( क ) कलकत्ता, ( ड ) दिल्ली.

( ६ ) 'निळी नदी' म्हणून ........ या नदीला संबोधले जाते.

( अ ) व्होल्गा, ( ब ) गंगा, ( क ) यांगत्सी कँग, ( ड ) नाईल.

( ७ ) भारताला भेट देणारा पहिला अमेरिकन अध्यक्ष ........ हा होय.

( अ ) जॉर्ज वॉशिंग्टन, ( ब ) आयसेनहॉवर, ( क ) रुझवेल्ट, ( ड ) ट्रूमन.

(८) भारतातील सर्वांत मोठे राज्य म्हणून ........ नामनिर्देश केला जातो.

(अ) आंध्रचा, (ब) महाराष्ट्राचा, (क) मध्यप्रदेशाचा, (ड) केरळचा.

(९) जगातल्या पहिल्या स्त्री पंतप्रधान ........ या होत.

(अ) इंदिरा गांधी, (ब) सिरिमाओ बंदारनायके, (क) गोल्डा मायर्स, (ड) सुचेता कृपलानी.

(१०) हिंदूंचे धार्मिक वाङ्मय ........ भाषेत आहे.

(अ) अर्धमागधी, (ब) संस्कृत, (क) पाली.

(११) ........ ही भारतातील सर्वांत मोठी मशीद होय.

(अ) जामा मशीद, (ब) जुम्मा मशीद, (क) जकेरिया मशीद, (ड) मोती मशीद.

(१२) शिवाजी महाराजांना कपटाने ठार मारण्याचा प्रयत्न प्रतापगडावर ........ याने केला.

(अ) अफझलखान, (ब) औरंगजेब, (क) शाइस्तेखान, (ड) खान खानान.

उत्तरे

(१) – अ, (२) – ड, (३) – अ, (४) – क, (५) – क, (६) – ड,
(७) – ब, (८) – क; (९) – ब, (१०) – ब, (११) – अ, (१२) – अ.

## मनन आणि चिंतन

□ जो शीलवान आणि ज्ञानी आहे, जो सत्यवादी आहे, आपले कर्तव्य जाणणारा आहे, अशांची संगत धरावी.

—गौतम बुद्ध


# कोणते बिळ कोणत्या उंदराचे?

फराळ, तुम्हांलाच फक्त आवडतो असे नाही तर तो उंदरानाही फार आवडतो! खमंग चकल्या, गोड करंज्या, गोल गोल लाडू.......आता तोंडाला सुटेल पाणी! म्हणून बाकीची यादी सांगण्याचे बंद करतो!

तर हे पदार्थ खाण्यासाठी चार उंदीर बाहेर पडले होते! खाण्यात इतके रमले की मनी मावशीचा आवाजही त्यांना कळला नाही. शेवटी त्यांच्या ते लक्षात आले.

आणि मग झाली पळापळ. आता या चारही उंदरांना आपापल्या बिळात परत जावयाचे आहे.

तुम्ही त्यांना मदत करा ना! ओळखा पाहू कोणते बीळ कोणत्या उंदराचे आणि ते सांगा त्यांना. मांजराच्या भीतीने बावरले आहेत ते!




## ‘ वाळवंटातील जहाज ’

डोक्यावर तळपणारा सूर्य आणि शेजारी खजुराचे झाड, यांच्या सान्निध्यात उभे असलेले ‘ वाळवंटातील जहाज ’ हे चित्ररूपाने तयार करण्याचे गोड काम आम्ही तुमच्यावर सोपवीत आहोत.

१ ते ४४ हे आकडे १--२-३-४ याच क्रमाने जोडत जोडत तुम्ही शेवटच्या ४४ या आकड्यापर्यंत आलात की उंटाचे सुंदर चित्र तयार होईल.

मग जोडा लवकर १ ते ४४ आकडे आणि तयार करा उंटाचे चित्र.



तथाकथित धनिकांवर विश्वास ठेवू नका.
जिवंत असण्यापेक्षा ते मेलेलेच अधिक आहेत.
तुमच्यापैकी जे नम्र आहेत,
जे शांत स्वभावाचे आहेत,
पण जे श्रद्धासंपन्न आहेत,
त्यांचीच काही आशा आहे.

ईश्वरावर श्रद्धा असू द्या.
मला खराखुरा माणूस द्या.
वारंवार मते बदलणाऱ्या माणसांच्या झुंडी
मला नको आहेत.
कुणाकडूनही सहाय्याची अपेक्षा करू नका,
सर्व प्रकारच्या मानवी सहाय्यापेक्षा
ईश्वर अनंतपटीने मोठा नाही काय ?
पवित्र बना. शुद्ध व्हा.

प्रभूवर श्रद्धा असू द्या.
त्याच्यावरच सर्वदा अवलंबून असा.
म्हणजे तुम्ही नेहमी उचित मार्गावर राहाल.
मग कोणतीही गोष्ट
तुम्हांला प्रतिरोध करू शकणार नाही.

— स्वामी विवेकानंद

## काही यांत्रिक शोध

| यंत्र | संशोधक | देश | इ. सन |
|---|---|---|---|
| मुद्रणयंत्र | गटेंबर्ग | जर्मनी | १४५० |
| सूत कातण्याचे यंत्र | हारग्रीव्हज | इंग्लंड | १७६४ |
| वाफेचे यंत्र | जेम्स वॅट | स्कॉटलंड | १७६५ |
| कॉटन जिन | एल्. व्हिटने | अमेरिका | १७९३ |
| वाफेची बोट | फुल्टन | अमेरिका | १८०७ |
| अभयदीप | हंफ्रे डेव्ही | इंग्लंड | १८१६ |
| काड्याची पेटी | जॉन वॉकर | इंग्लंड | १८२७ |
| विद्युत्‌जनक यंत्र | मायकेल फॅरडे | इंग्लंड | १८३१ |
| रीपर | मक्‌कॉर्मिक | अमेरिका | १८३४ |
| तारायंत्र | सॅम्युअल मोर्स | अमेरिका | १८३७ |
| फोटोग्राफी | लुई डॉगर | फ्रान्स | १८३९ |
| सायकल | किलपॅट्रिक मॅकमिलन | स्कॉटलंड | १८३९ |
| शिवण्याचे यंत्र | एलिस हॉवे | अमेरिका | १८४६ |
| विजेचा पाळणा | ओटिस | अमेरिका | १८६१ |
| टाइपरायटर | ख्रिस्टीफोर शोल्स | अमेरिका | १८७३ |
| टेलिफोन | अलेक्झांडर बेल | अमेरिका | १८७६ |
| फोनोग्राफ | एडिसन | अमेरिका | १८७७ |
| विजेचा दिवा | एडिसन | अमेरिका | १८७९ |
| पाणबुडी | जॉन हॉलंड | अमेरिका | १८९१ |
| डिझेल इंजिन | रुडॉल्फ डिझेल | जर्मनी | १८९२ |
| रेडिओ | मार्कोनी | इटली | १८९५ |
| विमान | राईट बंधू | अमेरिका | १९०३ |

# पाहू बरे तुमचे इंग्रजीचे ज्ञान

समोरच्या पानावर एक चित्र आहे. त्या चित्रात अनेक गोष्टी दिसत आहेत. उदाहरणार्थ, मुलगा, कुत्रा, घर. अरेच्या ! पण हे काय ! आम्ही कशी सांगणार सगळ्या वस्तूंची नावे !

या चित्रात किती गोष्टी आहेत हे तुम्ही शोधून काढावयाचे आहे आणि त्यांची नावे इंग्रजीतून लिहून काढावयाची·

आणि हे करत असताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवायची. ती म्हणजे इंग्रजीत जे चार अक्षरी शब्द असतील तेवढेच शोधायचे !

उदाहरणार्थ : HAND, FOOT याप्रमाणे. मग शोधा पाहू चार अक्षरी शब्द !

TREE, BIRD, ROOF, BUSH, LEAF, HAIR,
LEAD, HAND, FOOT, SOCK, SHOE, NOSE,
TAIL, PAWS, SPOT, HOME.



## ‘ जॅकोला रंगवा ’


तुमच्या आनंदात भर घालण्यासाठी आपले आवडते वाद्य वाजवीत हा जॅको समोर उभा आहे.

या जॅकोची ती तिरपी टोपी, ते हसरे डोळे, तो रुबाबदार सूट हे सगळे तुमच्यासाठीच आहे ! म्हणजे तुम्ही रंगविण्यासाठी !

पण रंग कोणते वापरावयाचे, चित्र कसे रंगवावयाचे हे सारे तुम्हीच ठरवायचे आहे.

तुम्हाला जे रंग आवडतील, जे जॅकोला शोभतील, ते रंग तुम्ही निवडा.

आणि चित्र रंगवून झाले की तुमच्या आवडत्या चित्रवहीत चिकटवून ठेवा.



"...अडचणी सोसून संकटात उडी घालण्याचे व शस्त्रास्त्रांनी पराक्रम गाजविण्याचे तुझे वय आहे. अडचणी येणारच. त्या आल्या तरी धैर्याची शिकस्त करण्यास हयगय करू नकोस. आळस व हयगय केल्याने राज्य टिकत नसते."

"... तुझ्याशी एक गोष्ट मला स्पष्टपणे बोललीच पाहिजे. स्नेही सोबत्यांना सोडून मला तुमच्याकडे येववत नाही, असे तू कळविले आहेस; असेच नेहमीही कळवतोस. हे तुला मुळीच शोभणारे नाही. लक्षात ठेव, राजा होणे म्हणजे साक्षात कैद आहे. कर्तव्य म्हणूनच ती स्वीकारावयाची असते."

"...तू पत्रे पाठवतोस पण ती लिहिल्यानंतर तू कधी-तरी फिरून वाचून पाहतोस का? तुझे ते अलीकडचे पत्र वाचताना मला कोण त्रास झाला! अस्पष्टता व अशुद्धता याची अगदी कमाल केलीस, वाचता वाचता अर्थच जर समजला नाही तर काय उपयोग! पत्रात आपली विद्वत्ता दाखविण्याचा तुझा प्रयत्नही असाच हास्यास्पद आहे. त्यामुळे सारे पत्र दुर्बोध होते. पत्र कसे साधे, स्पष्ट व सुबोध असावे. यापुढे तसा प्रयत्न करावयास विसरू नकोस."

—बाबराने हुमायुनास पाठविलेल्या पत्रातून

## ' युनो ' चे विविध उद्देश

१० जानेवारी १९४६ या दिवशी युनोचे पहिले अधिवेशन झाले.

या प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय संघटनेचे उद्देश असे आहेत—

" आम्ही संयुक्त राष्ट्रांमधील सर्व लोक, युद्धाने आमच्या एका पिढीतच दोनदा मनुष्यजातीचा संहार केला असल्यामुळे युद्ध पुन्हा होऊ द्यायचे नाही असा निश्चय करतो.

मानवाचे मूलभूत हक्क, मानवी जीविताचे मूल्य, स्त्री–पुरुष–समानता, लहान-मोठ्या राष्ट्रांतील समानता यांवर आमचा दृढ विश्वास आहे.

आंतरराष्ट्रीय करार, तह आणि करारमदार यांचा जगभर मान ठेवला जावा अशी परिस्थिती निर्माण करण्याची आमची इच्छा आहे.

सामाजिक प्रगती व्हावी, जीवनमान वाढावे, व्यक्तिस्वातंत्र्याचा विकास व्हावा अशी आमची धारणा आहे.

हे सर्व उद्देश साध्य होण्यासाठी,

परमसहिष्णुता दाखविण्याचा, चांगले शेजारी या नात्याने एकमेकांशी शांततेने वागण्याचा,

जागतिक शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी सर्व शक्ती एकवटण्याचा,

फक्त सामुदायिक हितासाठीच लष्करी बळ वापरण्याचा,

सर्व लोकांची आर्थिक व सामाजिक उन्नती साधण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांचा उपयोग करण्याचा;

आमचा निश्चय असल्यामुळे वरील उद्देश साध्य होण्यासाठी परस्पर सहकार्याने झटण्याचा आम्ही निर्धार केला आहे.


या निर्धाराप्रमाणे, आमच्या प्रत्येकाच्या सरकारने सॅन्फ्रान्सिस्को येथे जमलेल्या आपल्या प्रतिनिधींच्या मार्फत युनो सनदेला मान्यता दिली आहे आणि या लेखाद्वारे युनो या नावाने ओळखली जाणारी एक आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करीत आहोत. "

## ही मुले खाऊ कोणाला देत आहेत ?

ही मुलगी हातातील बिस्किटे कोणाला खावयास देत आहे. असा प्रश्न आमच्याप्रमाणेच तुम्हांलाही पडणे स्वाभाविकच आहे; पण याचे उत्तर मात्र अगदी सोपे आहे.

समोरच्या चित्रात १ ते ३० आकडे इंग्रजीत लिहिलेले आहेत. ते आकडे १–२–३–४ या क्रमाने जोडा. असे तुम्ही ३० आकड्यांपर्यंत जोडत आलात की बिस्किटे खाणाऱ्या या प्राण्याचे चित्रच तुम्हास पाहावयास मिळेल आणि मग तुम्ही सहजच ओळखू शकाल तो प्राणी !

चला तर मग. करा सुरुवात...आणि शोधून काढा बिस्किटे खाणारा ! अरे हो ! हा प्राणी तर आता रुसून मान दुसरीकडेच वळवून बसला की ?




# ग्लासातून ग्लास आरपार जातो.

**दृश्य** : जादूगार हातात दोन ॲल्युमिनियमचे ग्लास घेऊन स्टेजवर प्रवेश करतो. तो प्रेक्षकांना म्हणतो, " मी हे ग्लास एकमेकांतून आरपार घालवणार आहे." आणि तो डाव्या हातात एक ग्लास घेतो व उजव्या हाताने दुसरा ग्लास डाव्या हातातील ग्लासात वरून सोडतो. तेव्हा तो ग्लास खालील ग्लासातून आरपार गेलेला प्रेक्षकांना दिसतो. लगेच खाली पडलेला ग्लास घेऊन तो पुन्हा वरून खालच्या ग्लासात सोडतो. ही क्रिया तो इतक्या जलद रीतीने करतो की, ते दोन्ही ग्लास एकमेकांतून आरपार जाताहेत असे प्रेक्षकांना दिसते व प्रेक्षक चकित होतात.




**खुलासा** : या प्रयोगात ग्लास दुसऱ्या ग्लासातून आरपार वगैरे काही जात नाही. हा एक दृष्टिभ्रमाचा प्रयोग आहे. जादूगार डाव्या हातातील ग्लास आपल्या डाव्या हाताचा आंगठा व शेजारचे बोट यांच्या चिमटीत धरतो व उजव्या हाताने वरून जेव्हा दुसरा ग्लास खाली सोडसो, तेव्हा झट्कन खालचा ग्लास सोडून वरचा ग्लास बोटांच्या चिमटीत पकडतो. ही क्रिया तो इतक्या जलद रीतीने करतो की, प्रेक्षकांना वाटते, वरचा ग्लास खालच्या ग्लासातून आरपार गेला. अर्थात यासाठी पुष्कळच सराव करावा लागेल हे उघड आहे.



माझ्या मना ! सत्यासारखी तपश्चर्या नाही.
असत्यासारखे पाप नाही.
ज्याच्या हृदयात सत्य आहे
त्याच्या हृदयात परमेश्वर आहे.

माझ्या मना ! सत्याचरणाचा मार्ग
उंच खजुरीच्या झाडासारखा आहे.
त्या उंच झाडावर चढल्यास रसाळ फळे मिळतात
आणि त्यावरून पडल्यास
चक्काचूर व्हायला वेळ लागत नाही.

माझ्या मना ! सर्वांवर दया कर.
कीटक काय किंवा हत्ती काय,
सारे ईश्वराचेच प्राणी आहेत.

माझ्या मना ! दुःखाच्या वेळी
सारेच परमेश्वराचे स्मरण करतात.
पण सुखाच्या वेळी
त्याची कुणालाच आठवण होत नाही.
सुखाच्या वेळी त्याचे स्मरण केल्यास
कुणीच दुःखी होणार नाही.

माझ्या मना ! मनाचा मलीनपणा जात नसेल
तर स्नान करून काय फायदा ?

माझ्या मना ! मी वाईट मनुष्यास शोधण्यास निघालो
पण मला कुणीच वाईट मनुष्य आढळला नाही.
मी माझे अंतःकरण शोधले
तेव्हा माझ्याइतका वाईट कुणी नाही
असे मला आढळून आले.

— संत कबीर

## मनीमाऊंमधील फरक ओळखा

नट्टूनथटून मोठ्या ऐटीत मनीताई उभी राहिली. आणि तिच्या पाठीवर पाहिलंत का? घिटुकली माऊसुद्धा तितक्याच ऐटीत उभी राहिली. केशवराव प्रभूंनी आपली छबी टिपावी अशी या माय-लेकींची खूप इच्छा आहे.

या दोघींची इच्छा जाणून केशवराव प्रभू त्यांच्याकडे गेले. त्यांना पाहताच मनीताई खूष झाली. तिने चेहऱ्यावर हास्य आणले. छोट्या माऊने सुद्धा चेहरा हसरा केला.

प्रभूंनी कॅमेरा ठीकठाक केला. बटन दाबणार इतक्यात—

इतक्यात झाले काय?

पहिल्या मनीताईसारखी दुसरीही एक मनीताई आपल्या पिल्लासह अकस्मात हजर झाली. या दोघींत विलक्षण साम्य आहे. पण .... काही गोष्टी एकमेकींशी अजिबात जुळत नाहीत.

त्या कोणत्या ते शोधून काढा.





# पाहू बरे तुमचे ज्ञान !

वरील चित्रासंबंधी खाली अ, ब आणि क मध्ये काही विधाने दिलेली आहेत. त्यांपैकी प्रत्येकातील एकेक विधान वरील व्यक्तीसंबंधी आहे.

आता ओळखा पाहू नेमकी ही व्यक्ती आणि या व्यक्तीसंबंधीची विधाने!

या विधानाची उत्तरे याखाली दिलेली आहेत. तथापी ती आधी पाहण्याचा मोह टाळा. स्वतः *प्रामाणिक प्रयत्न करा. तुमची उत्तरे तयार झाली म्हणजे मगच आम्ही* दिलेली उत्तरे पाहा.

[अ] (१) दुसरा बाजीराव (२) विश्वासराव (३) नेपोलियन (४) हिटलर (५) तात्या टोपे

[ब] (१) अब्दीची लढाई (२) पानिपतची तिसरी लढाई (४) वॉटर्लूची लढाई (४) नॉर्मंडीची लढाई (५) स्वातंत्र्ययुद्ध १८५७

[क] (१) या लढाईत जो तह झाला त्या तहाने पेशवाई नामशेष झाली. (२) या लढाईतील पराभवानंतर मराठेशाहीची प्रतिष्ठा व अस्तित्व धोक्यात आले. (३) या लढाईतील पराभवानंतर यांच्या नशिबी मरेपर्यंत कारावास आला. (४) दुसऱ्या महायुद्धाला कलाटणी देण्यास ही लढाई कारणीभूत ठरली. (५) या युद्धाच्या पराभवामुळे फासावर चढून हौतात्म्य पत्करले.

(अ) ३ (ब) ३ (क) ३

३५१

# शाईची फुले करणे



**दृश्य**— स्टेजवर जादूगार हातात एक ॲल्युमिनिअमचा ग्लास व निळ्या रंगाचा हातरुमाल घेऊन येतो. तो प्रेक्षकांना म्हणतो, "लोकहो, ऐका! एकदा मी एका लग्नसमारंभाला गेलो होतो. त्या वेळी नवरदेवाच्या अंगावर लोकांनी फुले उधळली. परंतु मी फुले नेण्यास विसरलो होतो. म्हणून मी एकाकडून शाईची बाटली मागवून घेतली व ती शाई एका ग्लासात ओतून तो ग्लास नवरदेवाच्या डोक्यावर उपडा केला. तो काय आश्चर्य? त्या ग्लासातून नवरदेवाच्या डोक्यावर फुलांचा वर्षाव झाला. हाच प्रयोग मी आपणांस आता करून दाखविणार आहे." असे म्हणून तो एका प्रेक्षकास स्टेजवर बोलावून सांगतो की, "या ग्लासातील शाईने तुम्ही या कागदावर लिहून पाहा." प्रेक्षक त्याप्रमाणे लिहून खात्री करून घेतो व ग्लासात शाईच असल्याचे इतरांना सांगतो. नंतर जादूगार त्या ग्लासावर एक निळा रुमाल टाकतो व आपली जादूची कांडी त्यावरून फिरवितो. नंतर झटकन तो रुमाल काढून ग्लास प्रेक्षकांच्या दिशेने फेकल्यासारखे करतो. त्याबरोबर ग्लासातून शाईऐवजी फुलांचा वर्षाव प्रेक्षकांवर होतो व ते चकित होतात.

**खुलासा**— या प्रयोगातील ॲल्युमिनिअमच्या ग्लासाच्या तोंडावर बरोबर बसेल असे एक खोलगट झाकण असते. त्या झाकणात शाई असते व ग्लासात खाली फुले असतात. जादूगार जेव्हा रुमाल उचलतो, तेव्हा त्याच वेळी हातचलाखीने ते वरील झाकण उचलून घेतो व खालची फुले प्रेक्षकांच्या अंगावर टाकतो. रुमाल शाईच्या रंगाचा असल्याने यदाकदाचित शाई रुमालावर सांडली तरी डाग दिसून येत नाही.



## मदत करा

पंधराव्या व सोळाव्या शतकात व्यापाराची वाढ, नवीन जग शोधण्याचा हव्यास, संपत्तीचा लोभ, मसाल्याच्या पदार्थांची गरज इत्यादी विविध कारणांनी युरोपमधील प्रमुख नाविक देशांनी नवीन भूमिसंशोधनात व जलमार्गाच्या शोधात भाग घेतला.

अशा प्रयत्नात भाग घेतलेल्या काही प्रमुख भूमिसंशोधकांची चित्रे सोबतच्या पानावर दिली आहेत. तसेच पोर्तुगीजांच्या भारतातील वसाहतींचा पहिला गव्हर्नर यांचेही चित्र आहे.

आमच्या कंपोजिटरकडून चित्रे छापताना त्यांची अदलाबदल झाली. आता आपण त्या व्यक्ती ओळखायला आम्हांला मदत करा ना ?

१. अल्बुकर्क २. फर्डिनंड मॅगेलन
३. वास्को-द-गामा ४. कोलंबस

(१)



धाडसी दर्यावर्दी कोलंबस

(२)



साहसी नाविक वास्को-ड गामा

(३)



थोर भूमी संशोधक फर्डिनंड मॅगेलन

(४)



भारतातील पोर्तुगीज वसाहतींचा
पहिला गव्हर्नर अल्बुकर्क

# शिकंदर

[ ग्रीकांचा राजा फिलिप व राणी ऑलिंपिया यांचा मुलगा शिकंदर. शिकंदराच्या २० व्या वर्षी फिलिपचा खून झाला. फिलिपच्या मृत्यूनंतर शिकंदर राजा झाला. राजा झाल्यावर अवघ्या दहा वर्षांत भीमपराक्रम करून शिकंदरने अनेक देश जिंकले म्हणून त्यास 'जगज्जेता' म्हणतात. तो आपल्या वडिलांस फार मानीत असे. आईबद्दल तर त्याला नितान्त भक्ती होती. "माझ्या आईच्या डोळ्यांतून जरी एक अश्रू निघाला तरी माझे राज्य व माझा पराक्रम ही केवळ मातीमोल होत" असे तो म्हणे. आई-वडिलांप्रमाणेच गुरुबद्दलही त्याला पूज्यभाव होता. त्याचीच ही लहानपणची एक गोष्ट. ]



ॲरिस्टॉटल

सुमारे सव्वादोन हजार वर्षे झाली या गोष्टीला. शिकंदर बादशहाच्या आईवडिलांस त्याच्या शिक्षणाबद्दल फार कळकळ होती. आपण राजे, आपल्या मुलास शिक्षणाची जरूर काय, असे त्यांना चुकूनसुद्धा वाटले नाही. त्या काळी ग्रीसमध्ये ॲरिस्टॉटल या नावाचा एक मोठा शिक्षक होता. त्याच्याकडून आपल्या शिकंदरास शिक्षण द्यावे असे त्यांनी ठरविले. खुद्द फिलिपने ॲरिस्टॉटलास पत्र लिहिले, त्यात तो म्हणतो, "देवाने आम्हांस पुत्र दिला ही त्याची आम्हां मातापित्यांवर तर कृपा आहेच; परंतु तुमच्या हयातीत हा पुत्र दिला ही त्याची महत्कृपा होय. याबद्दल मी ईश्वराचा फार ऋणी आहे. हा माझा पुत्र आपला शिष्य व्हावा; तो अज्ञानी आहे त्याला ज्ञानी करावे, अशी आपणांस विनंती आहे. आपण हे कर्तव्य उत्तमप्रकारे बजावाल याबद्दल मला संपूर्ण भरंवसा आहे." याप्रमाणे पत्र लिहून शिकंदरास त्यांनी ॲरिस्टॉटलच्या हाताखाली शिक्षणासाठी ठेवले.

शिकंदरासारखा बुद्धिमान व चौकस विद्यार्थी आणि ॲरिस्टॉटलसारखा विद्वान व ममताळू शिक्षक! दुधात साखर पडल्यासारखे झाले. आपली विद्या शिकविण्यास शिकंदरासारखा दुसरा शिष्य मिळ-वयाचा नाही, असे ॲरिस्टॉटलला सारखे वाटे. थोड्याच वर्षांत शिकंदर एक हुषार विद्यार्थी झाला. यावेळी शिकंदर पंधरा वर्षांचा होता. आपला पुत्र हुशार झाल्यामुळे ऑलिंपिया व फिलिप यांस फारच धन्यता वाटली. यात आपल्या मुलाच्या अंगची हुषारी असली तरी त्याच्या गुरूच्याच कर्तबगारीची किंमत जास्त आहे हे त्यांना माहीत होते. त्यांनी या कामगिरीबद्दल ॲरिस्टॉटलला मोठी नेमणूक करून दिली.



शिकंदर

आईवडिलांचे कर्तव्य त्यांनी केले; पण शिकंदर आपल्या गुरूचे उपकार पूर्णपणे जाणून होता. तो ते कधीही विसरला नाही. आपले गुरू विद्वान असून त्यांच्यामुळेच मी इतके शिकू शकलो अशा पूज्य भावनेने तो त्यांच्याशी वागे. आपण राजपुत्र, तेव्हा गुरूचा तो मान काय राखायचा? असा मूर्खपणाचा विचार त्याच्या मनात कधीही आला नाही. तो आपल्या गुरूस आईवडिलांप्रमाणेच पूज्य मानी. तो उघडपणे म्हणे, ‘मातापित्यानी जन्म देऊन माझे पालनपोषण केले, आणि गुरुने विद्या देऊन माझ्या जन्माचे सार्थक केले. तेव्हा ती तिघेही मला सारखीच पूज्य आहेत.” पुढील आयुष्यात या गुणाचा त्याला अतिशय उपयोग झाला.

## हे चित्र कोणाचे हे तुम्हीच ठरवा

तुम्हांला चित्रकार होणं आवडेल ना ?

समोर १ ते ३१ असे आकडे आम्ही दिले आहेत.

हे सगळे आकडे आपण व्यवस्थित जुळविले तर तुमच्या नेहमीच्या पाहण्यातला, नव्हे तुमचा अत्यंत आवडता असा एक तुमचा मित्र समोरच्या पानावर तयार होईल.

आता १ ते ३१ आकडे क्रमाने जुळवा व चित्र तयार करा.



1
2
3
4
5
6
7
8
9
10
11
12
13
14
15
16
17
18
19
20
21
22
23
24
25
26
27
28
29
30
31

हा पप्पू म्हणजे धडपडया मुलगा. सारख्या याच्या खोड्या सुरूच असतात.

आता आजचंच पहा ना, घरामध्ये उंदरांचा सुळसुळाट झाला होता. रात्री पिंजरा लावून ठेवण्यात आला. त्या पिंजऱ्यात चांगले चार उंदीर सापडले.

सकाळी घरातील कुणाचेच लक्ष नाही असे पाहून या पप्पूने घरातील पिंजरा बागेत आणून गुपचूप उघडला.

आणि पिंजऱ्यातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक उंदीरमामाला मनी-मावशीच्या ताब्यात देण्याचे ठरविले.

पण गंमत काय झाली माहीत आहे ? पप्पूने पिंजऱ्याचे दार उघडताच चारही उंदीर पिंजऱ्यातून बाहेर पडले आणि पप्पूच्या जवळपास लपून बसले.

तुमच्या या पप्पूला ते चार उंदीर कुठे लपले आहेत ते सांगता का ?



दिवाळीचा सण आला की घरांना रंग दिला जातो.


त्या वेळी घरातील सगळे सामान खाली काढून ठेवले जाते आणि मग रंग देऊन झाला की सामान परत जाग्यावर ठेवले जाते.

अशाच एका घरातील सामान शेजारच्या चित्रात पडले आहे असे वाटते ना तुम्हाला ? पण ते साफ चूक आहे.

अहो, दिवाळीसाठी आगगाड्यांना किती प्रचंड गर्दी असते.

अशाच एका गाडीत दाटीवाटीनं चढलेल्या प्रवाशांचे सामान या गर्दीत अस्ताव्यस्त पडले आहे.

या अस्ताव्यस्त पडलेल्या सामानात कोणकोणत्या वस्तू पडलेल्या आहेत त्या तुम्ही शोधून काढा पाहू.



उत्तम चित्रकार एकासारखी अनेक चित्रे अगदी सहजगत्या काढू शकतो.


नव्हे, तशी चित्रे काढणे हे तर त्याचे कसबच असते.

पण काही वेळा काय होते माहीत आहे का तुम्हांला ?

अगदी एकसारखी अनेक चित्रे काढण्याच्या गडबडीत चित्रकारही काही वेळा चुकतो असे दिसते.

आता तो ती चूक मुद्दाम करतोकी त्याच्या हातून नकळत होते हे आम्हांलाही माहीत नाही. या शेजारच्या पाच चित्रांपैकी एका चित्रात चूक झाली आहे. ती चूक कोणत्या चित्रात झाली आहे हे तुम्हांला शोधता येईल का ?

पाहा प्रयत्न करून.



1
2
3
4
5

# विचित्र प्राणी

तुमच्या ओळखीच्या निरनिराळ्या प्राण्यांच्या अवयवांनी हा ‘ विचित्र प्राणी ’ तयार झाला आहे. कोणत्या प्राण्यांचे अवयव या प्राण्यांत आहेत ते तुम्ही सहज ओळखाल. जरा लक्षपूर्वक पाहा म्हणजे लपलेल्या प्राण्यांचे अवयव तुम्हांस दिसतील.

**उत्तरे**

( १ ) जिराफाचे कान ( २ ) सिंहाचे डोके ( ३ ) घोड्याचे पुढील पाय व शरीर ( ४ ) मांजराचे शेपूट ( ५ ) कुत्र्याचे मागील पाय.



# न्यूयॉर्क

## काल आणि

## आज

जगातील सर्वप्रथमांतील एक शहर म्हणून ज्याची गणना केली जाते त्या न्यूयॉर्क शहराची ओळख तुम्हांला भूगोलाच्या पुस्तकात झालेली आहे. १२० मजले असलेली ' न्यू एम्पायर ' ही जगातील सर्वोच्च इमारत न्यूयॉर्कमध्ये आहे, हे तुम्ही चटकन सांगाल. युनोचे मुख्य कार्यालयही तेथेच असल्याने न्यूयॉर्कची तुम्हांला ठळकपणे ओळख झालेली आहे. आजच्या विज्ञानयुगात झपाट्याने कायापालट होणाऱ्या या बहुरंगी शहराचा मूळ मनोरंजक इतिहास तुम्हांला ठाऊक आहे काय ?



न्यूयॉर्क : काल ( जुने पेंटिंग )

—आज जे न्यूयॉर्क म्हणून ओळखले जाते त्याचे मूळ नाव मॅनहटन असे होते. हेन्री हडसन या गृहस्थाने ११ सप्टेंबर १६०९ मध्ये मॅनहॅटन या बेटाचा प्रथमतः शोध लावला. या ओसाड आणि निर्मनुष्य बेटावर राहायला मात्र कोणी आले नाही. चार वर्षांनंतर एका युरोपियनाने धाडस करून या बेटावर राहण्याची तयारी दर्शवून पहिले घर बांधले. मॅनहॅटन या बेटावर हळूहळू वसाहतीला आकार येऊ लागला. न्यू नेदरलँड या बेटाचे जनरल डायरेक्टर पीटर मिन्यूट याने १६२६ मध्ये अवघ्या २४ डॉलर्सना रेड इंडियन्स-कडून हे बेट विकत घेतले. बेटावरची लोक-संख्या या वेळी होती अवघी २००.



न्यूयॉर्क : आज

१६६४ मध्ये इंग्रजांनी मॅनहॅटन बेट जिंकून घेतले, आणि त्यांनी आपल्या ड्यूकचे नाव या बेटाला दिल्या-मुळे मॅनहॅटन बेटाचे रूपांतर ड्यूक ऑफ यॉर्क या नावारून न्यूयॉर्क झाले. या न्यूयॉर्कचे थॉमस विलेट हे पहिले मेयर झाले. नऊ वर्षांनंतर म्हणजे १६७३ मध्ये डचांनी इंग्रजांच्या ताब्यात असलेले हे बेट जिंकले. डच राजपुत्र ऑरेंज याच्या नावावरून डचांनी न्यूयॉर्क हे नाव बदलून न्यू ऑरेंज हे नाव ठेवले,

परंतु इंग्रज स्वस्थ बसणारे होते काय ! त्यांनी चढाई करून न्यू ऑरेंज हे बेट पुन्हा एक वर्षाने जिंकून आपल्या ताब्यात घेतले व न्यूयॉर्क हे नाव पुन्हा ठेवले. एके काळी ओसाड असलेले मॅनहॅटन हे बेट आज जगात न्यूयॉर्क याच नावाने ओळखले जात आहे.

पोलिसांना गणवेष असावा ही मूळ कल्पना न्यूयॉर्कचीच. १८८४ मध्ये यासंबंधी अंमलबजावणी होऊन न्यूयॉर्कमधील सर्व पोलिसांना विशिष्ट प्रकारचे गणवेष पुरविण्यात आले. सर्वप्रथम पहिले तारायंत्र दळणवळणही १८४६ मध्ये न्यूयॉर्क आणि फिलाडेल्फिया यांच्या दरम्यान सुरू केले.

मॅनहॅटन या मुख्य बेटात नंतर अनेक बेटे समाविष्ट झाली. या सर्व बेटांना न्यूयॉर्क या नावाने ओळखण्यात येऊ लागले. नंतर न्यूयॉर्क शहराचा झपाट्याने विकास होत गेला, आणि आज न्यूयॉर्क शहर ३१९ चौरस मैलांत विखुरलेले आहे प्रारंभी अवघी २०० लोकसंख्या असलेले हे बेट आज सुमारे ९० लक्ष लोकसंख्येने गजबजलेले आहे. ४०० वर्षांपूर्वी मॅनहॅटन बेटाची किंमत होती फक्त २४ डॉलर ! आज याच न्यूयॉर्क शहराची किंमत आहे १९०,०००००,०००० डॉलर्स ! मॅनहॅटन या ओसाड बेटाचा झालेला हा कायापालट व्हायकिंग १ व २ च्या गतीसारखा नाही काय ?

*

## सुंदर ससा : चित्र रंगवा

पहा : पान क्र. २०-२१

एकदा काय झाले ? या ताईंना झाला ॲक्सिडंट आणि त्यात त्यांचे दोन्ही कान तुटले. सर्जन कोल्होबाकडे गेल्या या ताई. त्यांनी दुसरे कान आणून बसविले ते मात्र सशाचे. सर्जरी उत्तम झाली व या ताईंना सशाचे कान राहिले. अशी झाली ताईंची फजिती !

मग सर्वजन या ताईंना ' सुंदर ससा 'च म्हणू लागले. तुम्हीही ' सुंदर सशा 'चे चित्र रंगविले असेलच !

तुम्हाला ते खरोखरच सुंदर सशाचे चित्र वाटते का ? का अन्य कोणा प्राण्याचे ? ओळखा पाहू.

उत्तर : हे चित्र सुंदर सशाचे नव्हे; तर आहे लंबकर्ण खारुताईंचे !

*****************

## अगदी खरं सांगा हं !

*****************

तुमची मज्जासंस्था योग्य रीतीने काम करते का? हे शोधून काढण्यासाठी पुढील प्रश्नांची शक्य तितकी खरीखुरी उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करा :

(१) कोणत्याही मन:स्थितीत घरातून बाहेर पडताना तुम्ही दार जोराने आपटून बंद करता का?

(२) खोलीतील सामानाच्या रचनेमुळे तुम्हांला चीड येते का? त्यामुळे खोलीत वावरताना तुम्ही अडखळून धडपडता का?

(३) वादविवादाच्या वेळी तुमचा संयम सुटतो का?

(४) इतरांचे बोलणे चालू असताना तुम्ही अडथळे आणता का?

(५) बोलताना तुम्ही हातवारे करता का?

(६) तुम्ही कधी स्वत:शीच बोलता का?

(७) साध्या साध्या किरकोळ गोष्टींमुळे तुमच्या भावना दुखावल्या जातात का?

(८) रात्री अंथरुणावर पडल्यानंतर खूप वेळपर्यंत तुम्ही जागेच असता का?

या साऱ्या प्रश्नांची उत्तरे ' होय ' अशी असली तर तुमची मज्जासंस्था साफ कोलमडली असून तुमचे व तुमच्यामुळे इतरांचे जीवन असह्य होऊ नये यासाठी तुम्ही संयम पाळणे आवश्यक आहे.

यापैकी सहा प्रश्नांना ' होय ' उत्तर आले तर तुम्ही कोलमडण्याच्या स्थितीपर्यंत पोहोचले आहात, असे समजा. या अवस्थेन कुणाचेही भले झालेले नाही.

आणि जर केवळ तीन किंवा त्याहून कमी प्रश्नांना तुम्ही ' होय ' असे उत्तर दिले तर तुमची मज्जासंस्था अगदी उत्तम स्थितीत आहे. अभिनंदन.

बागेत गवत वाढलेले आहे. या बागेला फाटक केलेले आहे. कारण कोणीही आत शिरू नये यासाठीच ते केले आहे.

पण अशा बंद फाटकातून एक चुकार प्राणी आत शिरलाच. तो प्राणी तुम्हांला सध्या दिसणे मुळीच शक्य नाही.

मात्र १ ते ५४ आकडयांचे एक जाळेच समोरच्या चित्रात दिसत आहे ना ?

ते सारे आकडे क्रमवार व्यवस्थित जोडा म्हणजे तुम्हांला तो प्राणी दिसू लागेल.



## बिचारा जगू

जगूच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या मामाने त्याला सोनेरी मासे भेट म्हणून दिले. काचेच्या बरणीत हालचाल करणारे, उसळते सोनेरी मासे पाहून जगू तर हरखून गेला. उत्साहाच्या भरात आपल्या मित्रांना तो मासे दाखविण्यास निघाला. पण हाय ! वाटेत जगूने साष्टांग नमस्कार घातला. धडपडत तो जेव्हा उभा राहिला तेव्हा त्याच्या हातात बरणी होती पण त्यात मासे नव्हते. बरणीच्या बंदीत्रासातून मुक्त झालेले पाच सोनेरी मासे आसपास लपून बसले होते. बिचारा जगू ! बरणी उंच धरून म्हणतोय, 'अहो, माझे पाच मासे द्या ना शोधून !'



## ग्लासातील गुप्त होणारा रुपया !



**दृश्य** : जादूगार हातात एक काचेचा ग्लास व एक बंदा रुपया घेऊन येतो. तो प्रेक्षकांना म्हणतो, 'लोकहो, हा रुपया मी या काचेच्या ग्लासात टाकीत आहे. वरून हा रुमाल मी झाकतो. आता ही माझी जादूची कांडी फिरवून रुमाल काढल्याबरोबर तुम्हांला या ग्लासामधील रुपया नाहीसा झालेला दिसेल.' असे म्हणून जादूगार पुन्हा रुमाल उचलून दाखवितो तो काय ? ग्लासातील रुपया गायब !

**खुलासा** : या प्रयोगात सर्व खुबी रुमालात असते. रुमाल चांगला मोठा व रंगीबेरंगी असतो. या रुमालाच्या मध्यभागी एक नायलॉनचा काळा बारीक धागा शिवलेला असतो. हा धागा इतका बारीक असतो की साध्या डोळ्यांना तो सहसा दिसत नाही. या धाग्याच्या टोकाला एक मेणाची गोळी चिकटविलेली असते व या मेणाच्या गोळीला रुपया ( मध्यभागी ) चिकटविलेला असतो. जादूगार जेव्हा प्रेक्षकांना रुपया दाखवितो तेव्हा प्रेक्षकांना दोरा व मेणाची गोळी दिसणार नाही याची खबरदारी घेतो. नंतर तो रुपया ग्लासात सोडून झटकन् वरून रुमाल टाकतो. नंतर जादूची



कांडी फिरवून जेव्हा रुमाल उचलून घेतो, तेव्हा मेणाच्या गोळीला चिकटलेला रुपयाही रुमालाबरोबर बाहेर येतो, व प्रेक्षक रुपया नाहीसा झालेला पाहून चकित होतात. या प्रयोगात रुमाल भरपूर मोठा असणे आवश्यक आहे.

भारतीय देशबांधवांना उद्देशून मी अशी विनंती करतो की, तुम्ही कोठेही असा आणि तुमचा व्यवसाय कोणताही असो, तुम्ही सर्वांनी आपापले काम अत्यंत निष्ठापूर्वक केले पाहिजे. तुमच्यात जे काही चांगले असेल त्याचा उपयोग करून निरलसपणे देशाची सेवा करा.

राष्ट्रीय ऐक्य ही आजची अत्यंत निकडीची गरज आहे. सर्व भारतीयांनी मग त्यांचा धर्म किंवा व्यवसाय कोणताही असो, संघटित झाले पाहिजे व कितीही कष्ट पडले तरी ते उचलायला व त्याग करायला सिद्ध असले पाहिजे.


आपल्यात फूट पडेल अशा कोणत्याही विचारांना आपण थारा देता कामा नये. वाटेल ती किंमत देऊन आपण आपले स्वातंत्र्य अबाधित राखलेच पाहिजे.

देशाचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व यांचे रक्षण करण्याच्या निर्धाराने व राष्ट्रीय शिस्तीच्या नव्या जाणिवेने आपण सर्व मिळून एकत्र कार्य करू या.

—*लालबहादूर शास्त्री*
(ऑगस्ट ६५ मध्ये स्वातंत्र्यदिनी
केलेल्या भाषणातून)

## भुकेलेले माकड

दुपारची वेळ. गच्चीच्या एका टोकाला बसलेले एक माकड आशाळभूतपणे खाली रस्त्याकडे पाहात होते. एका लहान मुलाच्या हातातून पडलेल्या केळ्यावर त्याची नजर पडली आहे. ते केळे कसे मिळवावे या विवंचनेत ते आहे. गच्चींवरचा अवघड मार्ग पार करून ते केळे कसे हस्तगत करावे हे त्याला उमजत नाही. कदाचित तुमच्या साहाय्याने तो त्या केळ्यापाशी पोहोचूही शकेल. तुम्ही त्याला मार्ग दाखवा ना ?



तीन गुलाबाची फुले अगदी एकसारखी वाटतात ना? मग फसलात बरं का तुम्ही!

अगदी एकसारखी दिसणारी ही गुलाबाची फुले....

त्याच क्रमानं त्यांच्याखाली उंदिरमामांची वाट पाहत थांबणाऱ्या तीन मनीमावश्या.

आणि त्यांच्याही खाली त्याच क्रमानं दिसणारे तुमच्या बाल-मित्रांचे चेहरे.


ही सगळी चित्रे वेगवेगळी आहेत पण ती एकसारखी वाटतात; पण प्रत्यक्षात मात्र तसे नाही.


या तीन गुलाबांच्या फुलांपैकी एक फूल वेगळे आहे.

या तीन मनीमावश्यांपैकी एक मावशी वेगळी आहे.

आणि या तुमच्या तीन मित्रांतही थोडा फरक आहे असं आम्हांला वाटतं.

तुम्हांला नाही तसं वाटत? पाहा. विचार करा!!








## अदलाबदल

रेल्वेच्या एका डब्यातून चार वेगळ्या पेहरावाचे प्रवासी प्रवास करीत होते. चौघांचेही मुक्कामाचे ठिकाण सुदैवाने एकच होते. पहाटेच्या अंधारात उतरताना एकमेकांच्या टोप्यांची अदलाबदल झाली. स्टेशनावर अंधार असल्यामुळे चौघांच्याही ते लक्षात आले नाही. अंगावरचा वेगळा पोषाख आणि डोक्यावरची वेगळी टोपी यामुळे चमत्कारिक दिसणाऱ्या या प्रवाशांना प्रत्येकाच्या मूळ टोप्या त्यांच्या पेहरावावरून अचूक निवडून द्या.

उत्तर

ए = ३, बी = ४, सी = २, डी = १


1
2
A
B
3
4
C
D

******************

# तुमचे सामान्यज्ञान

******************

( १ ) महाराष्ट्राचे ' राजकवी ' कोण ?

( अ ) कुसुमाग्रज ( ब ) यशवंत ( क ) ग. दि. माडगूळकर.

( २ ) अपोलो-८ यानाचे कप्तान कोण होते ?

( अ ) बोरमन ( ब ) ॲन्ड्रयूज ( क ) कॉलिन्स.

( ३ ) ह्या वर्षी चीनने भारतावर आक्रमण केले.

( अ ) १९६० ( ब ) १९६२ ( क ) १९६४.

( ४ ) परदेशात " रामकृष्ण सेवाश्रम " स्थापणारा पुरुष हा आहे.

( अ ) स्वामी विवेकानंद ( ब ) स्वामी रामतीर्थ ( क ) स्वामी दयानंद.

( ५ ) ही कादंबरी तुरुंगात लिहिली गेली.

( अ ) ययाति ( ब ) मी ( क ) श्यामची आई ( ड ) पण लक्षात कोण घेतो ?

( ६ ) पहिले दैनिक वृत्तपत्र ह्या देशात निघाले.

( अ ) जर्मनी ( ब ) अमेरिका ( क ) हिंदुस्थान

( ७ ) या लोकांची घरे म्हणजे प्रवासी तंबू होत.

( अ ) पिग्मी ( ब ) एस्किमो ( क ) किरगीज.

( ८ ) कोणत्या नदीला ' चीनचे अश्रू ' म्हणतात.

( अ ) यॉगत्सेक्यांग ( ब ) व्हॅंगहो ( क ) सियॉंग.

( ९ ) ऑलिंपिक सामने साधारणतः किती वर्षांनी घेतले जातात ?

( अ ) दर चार वर्षांनी ( ब ) दरवर्षी ( क ) दर पाच वर्षांनी.

( १० ) कॉंग्रेसच्या पहिल्या स्त्री अध्यक्ष या होत.

( अ ) श्रीमती विजयालक्ष्मी पंडित ( ब ) श्रीमती इंदिरा गांधी

( क ) सरोजिनी नायडू.

(११) गिरनारच्या डोंगरात प्रामुख्याने हे आढळतात.
(अ) सिंह (ब) उंट (क) हत्ती.

(१२) 'चिमणरावाचे चऱ्हाट' हा विनोदी लेखसंग्रह ........ यांनी लिहिला.
(अ) य. ग. जोशी (ब) प्र. न. जोशी (क) चिं. वि. जोशी.

## उत्तरे

(१) ब (२) अ (३) ब (४) अ (५) क (६) अ (७) क
(८) ब (९) अ (१०) क (११) अ (१२) क

## एक !

**समानीव आकूतिः समाना हृदयानि वः ।**
**समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥**

—तुमचा सर्वांचा उद्देश एक असावा. तुमची अंतःकरणे एक असू द्या. तुमचे मन एक असू द्या, म्हणजे तुम्हास तुमचे ध्येय सहज साध्य होईल.

ऋग्वेद १०।१९१।४

✻

हे मानवा, जर तू नम्रता, चांगले आचरण, सुबुद्धी आणि परमेश्वरनाम, ईश्वरनाम आपल्याजवळ बाळगशील तर तुझ्या डोक्यावर असलेल्या पापांचा बोजा दूर होऊन तू मुक्त होशील.

—गुरु नानक


चित्र कसे काढावे ? हा प्रश्न तुम्हांला नेहमीच पडतो नाही ! बऱ्याच वेळा काय होते की चित्र एवढे मोठे असते की ते व्यवस्थित प्रमाणबद्धतेने काढताच येत नाही.


आम्ही मात्र तुमचा हा प्रश्न इथे सोडवला आहे.

समोरच्या पानावर ' माशा 'चे आणि ' फुलाचे ' अशी दोन चित्रे ८–८ चौकोनांत विभागून तुमच्यापुढे ठेवली आहेत. प्रत्येक चित्राशेजारीच ८–८ मोकळे चौकोनही ठेवले आहेत.

तुम्ही फक्त चित्राचा प्रत्येक चौकोनातील भाग त्या चित्राशेजारच्या मोकळ्या चौकोनात भरावयाचा आहे.


बघा बरे जमते की नाही ' माशाचे ' आणि फुलाचे हुबेहूब चित्र !





# चित्रावरून कथा तयार करा


कथा तयार करण्यापूर्वी चित्रे काळजीपूर्वक पहा. त्यांतील दिसणाऱ्या वस्तूंचे वा प्राण्यांचे निरीक्षण करा, आणि थोडक्यात गोष्ट तयार करा, व त्या गोष्टीला नाव द्या.



.................................................

.................................................

.................................................



.................................................

.................................................

.................................................



.................................................

.................................................

.................................................

# द्या तो संदेश

रेल्वेमंत्री असताना लालबहादूर शास्त्री एकदा मदुराईस गेले होते. मदुराई स्टेशनवर एक विश्रांतिगृह त्यांच्या खासगी सेवकवर्गासाठी राखून ठेवले होते. स्टेशनावर पोचल्यानंतर शास्त्रीजी त्या विश्रांतिगृहात येऊन बसले.

जरा वेळाने जिल्हा मॅजिस्ट्रेटचा संदेश घेऊन एक अधिकारी शास्त्री बसले होते तेथेच सरळ आला. डोक्यावर गांधी टोपी, सदरा आणि धोतर अशा साध्या पेहरावातील ठेंगण्याठुसक्या शास्त्रीजींना पाहून हा कोणी तरी स्थानिक कार्यकर्ता असावा असे त्या अधिकाऱ्याला वाटले.

" काय पाहिजे ? " शास्त्रीजींनी विचारले.

" हा संदेश मंत्रिमहाशयांना द्यायचा आहे. " अधिकारी म्हणाला.

" ठीक आहे, द्या इकडे तो संदेश. " लालबहादूर म्हणाले, " मी तो मंत्रिमहाशयांकडे पोचता करतो. "

शास्त्रीजींच्या हातात अधिकाऱ्याने संदेशाचा कागद ठेवला. कागद घेऊन शास्त्रीजी उठले तेव्हा अधिकारी म्हणाला, अहो या संदेशाचे उत्तरही त्यांच्याकडून आणा. "

लालबहादूर हसले. " ठीक आहे, घेऊन येतो. " असे म्हणत ते 'रेल्वे-मंत्र्यांच्या' खास डब्यात अदृश्य झाले.

जवळच एक वार्ताहर बसला होता. अधिकाऱ्याने रेल्वेमंत्री कुठे उतरले आहेत याची सहज चौकशी त्या वार्ताहराजवळ केली.

तो वार्ताहर हसून म्हणाला, " अहो, आता ज्यांच्याकडे रेल्वे-मंत्र्यांना देण्यासाठी तुम्ही संदेश दिला ना, तेच रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री ! "

अधिकारी सर्दच झाला !

# चित्र रंगवा

रंगविलेले सुंदर चित्र पाहिले की कोणालाही आनंद होतो. पण खऱ्या रसिक मनास आनंद होतो तो, ते चित्र स्वत: रंगविले तरच !

तुम्हांस नाही का वाटत आपणही एखादे सुंदर चित्र रंगवावे म्हणून ? आम्हांला खात्री आहे की आपणांस असे वाटत असणारच !

शेजारील पानावर आम्ही एक चित्र आपण रंगवावे यासाठी दिले आहे.

कोणते रंग कोणत्या ठिकाणी भरावेत हे खाली सांगितले आहे, त्याप्रमाणे रंग भरा.

ज्या ठिकाणी Y अक्षर आहे तेथे पिवळा
ज्या ठिकाणी G अक्षर आहे तेथे हिरवा
ज्या ठिकाणी B अक्षर आहे तेथे तपकिरी
ज्या ठिकाणी X अक्षर आहे तेथे निळा

वरीलप्रमाणे रंग भरून चित्र पूर्ण झाल्यावर रंगविलेले चित्र आपल्या मित्रांस दाखवा.



या नाशवंत जगात प्रत्येक वस्तूचा
नाश हा ठरलेला आहे.
पण विचार, ध्येय आणि महत्त्वाकांक्षा
ही टिकून राहतात.

एखाद्या विचारापायी एखादे मानवी शरीर बळी जाईल
तर जाईना का!
पण तोच विचार त्या मनुष्याच्या मरणानंतर
अनेक शरीरांत पुन्हा प्रकट झालेला दिसेल.

विकासाच्या गाडीची चाके ही
अशी पुढे पुढे जात असतात.
आणि एका पिढीचे विचार व आकांक्षा
यांचा ठेवा पुढील पिढीस प्राप्त होत असतो.

इतिहासाची साक्ष घ्या.
प्रतिपक्षाचा छळ सहन न करता
आणि कसोटीस न उतरता
कोणताही विचार प्रत्यक्ष व्यवहारात येऊ शकला नाही,
असेच तो सांगेल.

आपणांस ज्याचा जिव्हाळा वाटतो
अशा तत्त्वासाठीच जगणे आणि त्यासाठी मरणे
याहून अधिक आनंद कशात आहे?

आपल्या ध्येयाच्या यज्ञकुंडात
आपली आहुती देण्यातच जीवनाची सफलता आहे.


—नेताजी सुभाषचंद्र बोस

## पळणारा हुकमी चेंडू



**दृश्य** : जादूगार हातात एक मोठा चेंडू ( बॉल ) घेऊन येतो. तो चेंडू स्टेजवरच्या टेबलावर ठेवून तो प्रेक्षकांना म्हणतो, ' हा चेंडू मोठा रहस्यमय आहे. हा माझ्याशिवाय कोणाचाही हुकूम मानीत नाही. मी चल म्हटले की हा पळतो व थांब म्हटले की थांबतो. पाहा. ' असे म्हणून तो टेबलावरील चेंडूकडे पाहून म्हणतो ' चल बेटा, चल ' असे त्याने म्हटल्याबरोबर टेबलावरील चेंडू पळू लागतो. जादूगाराने ' ठहेरो ' असे म्हटल्याबरोबर चेंडू जागच्याजागी थांबतो. पुन्हा चल म्हटले की पळू लागतो व थांब म्हटले की थांबतो. हे पाहून आश्चर्यचकित झालेले प्रेक्षक टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करतात.

**खुलासा** : हा प्रयोग फारच सोपा आहे. टेबलावरच्या सतरंजीखाली, चेंडू बसू शकेल अशी गोल लोखंडी रिंग ( कडे ) असते. त्या कड्याला दोन्ही बाजूंना काळे चिवट धागे बांधलेले असतात. ते धागे सतरंजीखालून स्टेजच्या दोन्ही विंगजमध्ये नेलेले असतात. या दोन्ही बाजूच्या विंगजमध्ये दोन माणसे धागे ओढण्याकरिता बसलेली असतात. ज्या बाजूने दोरी ओढली जाईल त्या बाजूकडे टेबलावरची रिंग सरकते. त्याबरोबर त्या रिंगवर ठेवलेला चेंडूही हलू लागतो. मात्र रिंग टेबलावरच्या चादरीखाली असल्यामुळे प्रेक्षकांना दिसत नाही. ही रिंग चेंडूच्या मापाची हवी व या रिंगला बांधलेले काळे धागे, टेबलावरून व स्टेजवरून, सतरंजीखालून, दोन्ही विंगजकडे अशा रीतीने न्यावेत की ते प्रेक्षकांना मुळीच दिसून येऊ नयेत. तसेच दोन्ही बांजूंना दोरे ओढणारी माणसेही पूर्ण शिक्षण देऊन तयार केलेली असावीत.



“ आपले चालू काम पार पाडण्यासाठी झटत असताना कोणाबद्दलही मत्सर बाळगण्याचे आपल्याला कारण नाही. ते पार पाडताना आपण सर्वांकडे आदर-वृत्तीने पाहू या; आणि ईश्वराने दिलेली न्यायान्यायाची बुद्धी चालवून, जो न्याय म्हणून पटेल त्याचा आपण खंबीरपणाने पुरस्कार करू या.

जखमांनी जर्जर झालेले आपल्या राष्ट्राचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आपण त्या जखमांवर मलमपट्ट्या बांधू या. राष्ट्रसंरक्षणासाठी जे सैनिक धारातीर्थी पडतात अशा सैनिकांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या कुटुंबियांचा आपण आदर करू या. आणि आपसात तसंच सर्व राष्ट्रात न्यायाधिष्ठित चिरशांती निर्माण व्हावी व नांदावी यासाठी अवश्य ते सर्व काही करण्याला आपण उद्युक्त होऊ या–”

अब्राहम लिंकन
यांच्या अखेरच्या भाषणातून



## यांची ओळख आहे का?

हा फोटो पाहिलात ना? केव्हातरी, कुठेतरी हा फोटो पाहिल्याचे तुम्हांस आठवते का? एका थोर जागतिक व्यक्तीच्या बाळपणीचा हा फोटो आहे?

पहा बरे ओळख पटते का ते?

( उत्तर : महात्मा गांधी )

आपल्या जीवनाचा उद्देश स्वतः सुखी होणे व दुसऱ्यांनाही सुखी करणे हा आहे. त्याची सदैव आठवण ठेवा. दुसऱ्याच्या सुखासाठी आपणांस झटावयास मिळणे ही सुखद गोष्ट नाही का ? स्वतःच्या सुखासाठी केवळ आटापिटा मुळीच करू नका. इतरांना सुखी करण्याच्या प्रयत्नात सुख तुमच्याकडे आपण-हून चालत येईल.

पण या सगळ्यांसाठी परिश्रमांची आवश्यकता आहे. तुमच्यासाठी परिश्रम स्वहस्तेच पारितोषिकही घेऊन येतात. परिश्रम करताना परमेश्वराचे सदैव स्मरण ठेवा. आपले जीवल सुखमयी व्हावे अशीच परमेश्वराची इच्छा आहे. अशी माझी श्रद्धा आहे.

आपणांस जे प्राप्त होईल त्यामध्ये संतोष मानून त्याचा अत्यंत उचित उपयोग करा. जीवनाच्या कोणत्याही अपवित्र अंगाकडे न पाहता मांगल्याकडे पहा. जे आहे त्यापेक्षा अधिक चांगले करण्याचा प्रयत्न करा म्हणजे आपले चित्त सदैव प्रसन्न राहील.

—लॉर्ड बेडन पॉवेल

# हातातून रुमालांचा वर्षाव

**दृश्य :** जादूगार हातात एक रुमाल घेऊन स्टेजवर येतो व हातातील छोटा रुमाल प्रेक्षकांना दाखवून म्हणतो, 'या एका रुमालापासून मी तुम्हांला असंख्य रुमाल निर्माण करून दाखविणार आहे.' असे म्हणून तो रुमाल हाताच्या मुठीत धरून दोन्ही हात जोरजोराने हलवू लागतो. त्याबरोबर त्याच्या हातातून अनेक रंगीबेरंगी रुमाल स्टेजवर पडू लागतात. रुमालाचा पाऊस स्टेजवर पडलेला पाहून प्रेक्षक थक्क होतात.



**खुलासा :** जादूगार जो काळा कोट घालतो. त्या काळ्या कोटाच्या हाताच्या एका बाहीत आतल्या बाजूने अगदी टोकाला एक चोर-कप्पा असतो. त्या कप्प्यात नायलॉनचे अगदी पातळ रंगी-बेरंगी छोटे रुमाल रबराने बांधून लपवून ठेवलेले असतात. जेव्हा जादूगार जोरजोराने हात हलवू लागतो तेव्हा तो हळूच एका बोटाने रबर ओढून घेतो. त्याबरोबर अनेक रुमालांचा छोटा गठ्ठा त्याच्या हातात येतो. जादूगार मग जोरजोराने हात हलवून हे रुमाल स्टेजवर पाडतो व प्रेक्षक थक्क होऊन टाळ्यांचा कडकडाट करतात.



*

" का हो स्टेशनमास्तरसाहेब, मुंबईची गाडी किती वाजता येईल येथे ? " तिकीट विक्रीच्या खिडकीतून गुंड्यानं विचारलं. मास्तर म्हणाले. " काय रे गुलामा, आतापर्यंत पाच वेळां तुला सांगितलं की, ४-४४ ला येईल म्हणून. " गुंड्या म्हणाला, " मला माहीत आहे हो; पण ४-४४ म्हणतांना तुमच्या भरघोस मिशा हालतात ते पाहण्याची मौज वाटते मला ! "

## इंग्रजी सुभाषित तयार करा !

आम्ही आमच्या एका लेखक मित्राला वाचकांना आवडेल, पटेल, असे एक सुंदर इंग्रजी सुभाषित लिहून पाठविण्यास सांगितले.

पण आमच्या या मित्राने ते सुभाषित सरळ लिहून आमच्याकडे पाठवलेच नाही. त्याने ते जसे पाठविले तसेच आम्ही शेजारच्या पानावर छापले आहे.

आता ते सुभाषित काय असेल बरे ! हे तुम्ही शोधून काढावयाचे आहे. प्रथम त्याने अपुरी ठेवलेली अक्षरे पुरी करा आणि मग अक्षरे पूर्ण झाल्यावर त्या सर्व अक्षरांतून तयार होणारे सुंदर इंग्रजी सुभाषित आपल्या संग्रही अवश्य ठेवा.

MANY HANDS MAKE LIGHT WORK



तुम्ही आपल्या बांधवांवर प्रेम करता काय ?
मग ईश्वराला आणखी कुठे शोधाल ?
हे जे सर्व गरीब, दुःखी व दुर्बल आहेत
तेच ईश्वर नव्हेत काय ?

आधी त्यांची पूजा का करीत नाही ?
गंगेच्या काठी विहीर खणावयास का म्हणून जाता ?
विश्वास असू द्या की
प्रेम सर्वशक्तिमान आहे.

क्षुद्र नावलौकिकाची काय पर्वा !
तुमच्या हृदयात प्रेम आहे ना ?
मग तुम्ही सर्वशक्तिमान आहात !
तुम्ही पूर्ण निस्वार्थी आहात ना ?
मग तुम्हांला कुणीही
पराजित करू शकणार नाही.

चारित्र्याचाच सर्व ठिकाणी जय होतो.
मत्सर आणि अहंकार यांचा त्याग करून
दुसऱ्याच्या हितासाठी एकजुटीने कार्य करण्यास शिका.
याचीच आज आपल्या देशाला
अत्यंत गरज आहे.

जोवर श्रद्धा, सचोटी आणि अढळ निष्ठा
तुमच्या ठायी आहेत तोवर
सर्व बाजूंनी तुमची भरभराटच होईल.


—*स्वामी विवेकानंद*

# रुमालातील आंगठी पावातून निघते

**दृश्य :** जादूगार हातात एक सुंदर आंगठी व एक काळा रुमाल, तसेच जादूची कांडी घेऊन स्टेजवर प्रवेश करतो व प्रेक्षकांना म्हणतो, "माझ्या हातात ही जी आंगठी आहे ती साधीसुधी आंगठी नसून जादूची आंगठी आहे. ही आंगठी मी या काळ्या रंगाच्या रुमालात ठेवतो. एक, दोन, तीन म्हटल्याबरोबर ही आंगठी रुमालातून नाहीशी होऊन ती दुसरीकडून निघेल." असे म्हणून तो रुमालात आंगठी ठेवतो व एक, दोन, तीन म्हणून झटकतो. रुमालातील आंगठी नाहीशी होते. नंतर जादूगार टेबलावर ठेवलेला पाव ( ब्रेड ) हातात घेतो व सुरीने मधोमध कापून दोन तुकडे करतो.' त्याबरोबर पावातून आंगठी बाहेर पडते व प्रेक्षक थक्क होतात.



**खुलासा :** जादुगाराजवळ जो काळा रुमाल असतो, त्याच्या एका कोपऱ्यात एक आंगठी अगोदरच शिवून ठेवलेली असते. जादूगार जेव्हा रुमालात आंगठी ठेवतो, तेव्हा ही आंगठी तो प्रेक्षकांना दाखवितो व खरी आंगठी चलाखीने आपल्या सहकाऱ्याजवळ देतो. तो सहकारी, ती आंगठी हळूच त्या पावामध्ये बाहेरून घुसडून देतो. जादुगार रुमाल झटकतो तेव्हा रुमालात आंगठी नसतेच. तो ब्रेड कापतो तेव्हा आंगठी निघते व प्रेक्षक चकित होतात.



## जपानी युवती : चित्र रंगवा

आतापर्यंत तुम्ही बरीच चित्रे रंगवलीत. सशाचे, सिंहाचे, जॅकोचे इ०. पण ती चित्रे रंगविताना तुमच्यावर वेळेचे बंधन नव्हते.

आता तुम्ही चित्रे रंगविण्यात पटाईत झालात. तेव्हा बघू या तुम्हांला वेळेच्या बंधनात चित्र रंगवता येते का ते !

समोरच्या पानावर एका जपानी युवतीचे चित्र दिले आहे. ते तुम्ही फक्त १ तासात रंगवायचे आहे. तर मग करा बघू सुरुवात.




# रंग बदलणारी पिसे



**दृश्य :** जादूगार हातात दोन निरनिराळ्या रंगांची पिसे घेऊन येतो. त्यापैकी एकाचा रंग गुलाबी व दुसऱ्याचा रंग हिरवा असतो. जादुगार प्रेक्षकांना म्हणतो, 'ही दोन अद्‌भुत रंग बदलणारी पिसे आहेत. त्यापैकी हे गुलाबी रंगाचे पीस मी या कागदाच्या गुंडाळीत टाकतो. तुमच्या समोर या पिसांचा रंग बदलून ते बाहेर येईल.' असे म्हणून तो गुलाबी रंगाचे पीस एका वर्तमानपत्राच्या गुंडाळीत टाकतो. नंतर तो त्या गुंडाळीच्या खालच्या बाजूने हळूहळू पीस ओढू लागतो. ते जेव्हा संपूर्णपणे बाहेर येते तेव्हा त्या पिसाचा रंग संपूर्णपणे बदललेला पाहून प्रेक्षक थक्क होतात. नंतर जादूगार पुन्हा हिरवे पीस त्या गुंडाळीत टाकतो. या खेपेस हिरव्या पिसाचा रंग बदलून ते गुलाबी होते व प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करतात.

**खुलासा :** या प्रयोगातील गुलाबी रंगाचे जे पीस असते ते एका पत्र्याच्या पोकळ नळकांडीवर, सरसाने पिसे चिकटवून तयार केलेले असते. त्या पोकळ नळकांडीवर, जादूगार जेव्हा गुलाबी रंगाचे पीस कागदाच्या गुंडाळीत टाकून ते खालून गुंडाळीच्या बाहेर काढतो, तेव्हा ते गुलाबी पीस गुंडाळीतच राहते, व आतील दुसऱ्या रंगाचे पीस बाहेर येते. प्रेक्षकांना मात्र पिसाचा रंग बदललेला पाहून अतिशय आश्चर्य वाटते. नंतर जेव्हा जादूगार हिरव्या रंगाचे पीस परत कागदाच्या गुंडाळीत टाकतो, तेव्हा हे हिरवे पीस गुलाबी पीसाच्या पोकळीत जाऊन बसते व गुलाबी पीस बाहेर येते. प्रेक्षकांना मात्र हिरव्या रंगाच्या पिसाला, गुलाबी रंग प्राप्त झाला असेच वाटते.



## उठा, जागे व्हा !

मित्रांनो, आपण सर्वजण सतत कार्य करू या.
ही काही झोप घेण्याची वेळ नाही.
भारताचे भवितव्य आपल्याच कार्यावर अवलंबून आहे.

भारतमाता आपल्याकडे मोठ्या आशेने पाहात आहे.
तुमच्या डोळ्यांवर केवळ झापड आलेली आहे.
उठा, जागे व्हा, आपल्या या प्राणप्रिय भारतमातेला
तिच्या त्या वैभवशिखरावर पुनः विराजमान झालेली पाहा.

तिच्यात नवचैतन्याचा संचार होऊ द्या.
आणि पूर्वी कधीही तिला लाभले नसेल,
अशा अपूर्व वैभवाने ती परत एकदा तळपू द्या.
त्यातच तुमच्या, आमच्या
सर्वांच्या जीवनाचे खरे सार्थक आहे.


—स्वामी विवेकानंद

# कागद जाळून नोट तयार करणे

**दृश्य :** जादूगार हातात वर्तमानपत्राचा कागद घेऊन येतो. नंतर तो प्रेक्षकांना म्हणतो, "हा कागद जाळून त्याची राख मी हातात चोळताच त्या राखे-पासून एक रुपयाची नोट तयार होईल." असे म्हणून तो हातातील कागद प्रेक्षकांदेखत जाळतो व त्या कागदाची राख हातात चोळतो. त्याबरोबर त्याच्या हातात एक रुपयाची नोट तयार होते व प्रेक्षक चकित होतात.

**खुलासा :** ज्यावेळी जादूगार हातात कागद जाळण्यासाठी आगपेटी घेतो





त्या वेळी ती आगपेटी अर्धवट उघडी असते व तिच्यात मागच्या बाजूला एक रुपयाची नोट घडी करून ठेवलेली असते. जादूगार केव्हा काडी ओढून आगपेटी बंद करतो, त्या वेळी ती नोट आपोआप त्याच्या हातात येते, व तीच नोट प्रेक्षकांना दाखवून तो त्यांना चकित करतो.

आज मानवाच्या सांस्कृतिक घडामोडींना विशेष महत्त्व आले आहे. प्राचीन काळापासून माणसाने समाज कसा बनविला. धर्म, तत्त्वज्ञान, कायदेकानू यांची निर्मिती कशी झाली; मानवांच्या प्रगतीच्या खुणा कोणत्या देशात व कोणत्या संस्कृतीत समान दिसतात. पडत्या काळात वा आक्रमणाच्या काळात संस्कृतीचे रक्षण कसे झाले ?

शांतता, विश्वबंधुत्व, मानवता, समभाव इत्यादी मनोवृत्तींची जोपासना कशी झाली ? याचा आपण विचार करू लागलो असता भूतकाळातील अनेक व्यक्तींचे प्रयत्न त्यामागे उभे असल्याचे आपणांस दिसून येते.

त्यांपैकी काही व्यक्ती पुढील पाच पानांवर दिल्या आहेत. ओळखा पाहू. त्या व्यक्ती : –

सर्व व्यक्ती ओळखता आल्यास = सर्वोत्कृष्ट ज्ञान

१५ व्यक्ती ओळखता आल्यास = उत्तम ज्ञान

१० व्यक्ती ओळखता आल्यास = बरे ज्ञान

# नावांतील फरक ओळखा

(१)



नामदार गोखले

(२)



महात्मा फुले

(३)



लोकमान्य टिळक

(४)



गो. ग. आगरकर

१ = लोकमान्य टिळक, २ = गो. ग. आगरकर, ३ = नामदार गोखले, ४ = महात्मा फुले.


# नावे बरोबर करा

(१)



दादाभाई नवरोजी

(२)



चक्रवर्ती राजगोपाळाचारी

(३)



लॉर्ड माउंटबॅटन

(४)



सरदार वल्लभभाई पटेल

१ = दादाभाई नवरोजी, २ = सरदार वल्लभभाई पटेल,
३ = लॉर्ड माउंटबॅटन, ४ = चक्रवर्ती राजगोपाळाचारी.

## नावांतील फरक ओळखा

(१)




ॲटली

(२)



चर्चिल

(३)



स्टॅलिन

(४)



लेनिन

१ = लेनिन, २=स्टॅलिन, ३ = चर्चिल, ४ = ॲटली.

# नावांतील फरक ओळखा

(१)



सवाई माधवराव

(२)



नाना फडणिस

(३)



थोरले माधवराव पेशवे

(४)



शाहू छत्रपती

१ = थोरले माधवराव पेशवे, २ = शाहू छत्रपती, ३ = सवाई माधवराव, ४ = नाना फडणिस.

# बरोबर आहे की कसे ? ते पहा.

(१)



झरतुष्ट्र

(२)



येशू ख्रिस्त

(३)



श्रीबसवेश्वर

(४)



गुरू नानक

१ ते ४ = सर्व बरोबर

## सांगा पाहू !

एका गावात एक श्रीमान व्यापारी राहात होता. त्याचा व्यवसायाचा व्यापही प्रचंड होता. व्यापाराच्या वस्तू ठेवण्याचे गुदामसुद्धा बरेच मोठे होते.

एकदा त्या व्यापाऱ्याला कामानिमित्त अमेरिकेला जावयाचे होते. निघण्याची सर्व तयारी झाली होती. शेटजी निघण्याच्या तयारीत असतानाच गुदामाचा चौकीदार धावतच आला आणि कळवळून परदेशी न जाण्यासाठी शेटजींना विनवू लागला. जायचेच असेल तर आज तरी मुळीच जाऊ नका अशी विनवणी त्याने सुरू केली.


त्याचे कारण विचारता तो शेटजींना म्हणाला, “काल रात्री मी गाढ झोपेत असताना एक भयानक स्वप्न पडले. तुम्ही जात असलेले विमान डोंगरावर आदळले व सर्वच्या सर्व प्रवासी मृत्यू पावले. शेटजी तुम्ही आज खरेच जाऊ नका.” शेटजी-नींही त्याच्या म्हणण्याचा विचार केला व आपला जाण्याचा बेत रद्द केला.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात ठळक बातमी आली. “अमेरिकेला जाणारे विमान कोसळून सर्व प्रवासी ठार !”

शेटजींना आपला जीव वाचल्याचा अतिशय आनंद झाला. चौकीदारामुळे आपला जीव वाचला म्हणून त्याचा त्यांनी सत्कार केला व १०००१ रुपये बक्षिसा-दाखल दिले आणि त्याच दिवशी त्याला नोकरीवरून काढून टाकले.

चौकीदाराचा सत्कार करून त्याला १०००१ रुपये दिले हे योग्यच झाले. पण त्याला नोकरीवरून का काढून टाकले ते काही कळत नाही. तुम्ही आम्हांला ते सांगा ना !”

चौकीदाराला गाढ झोपेत • स्वप्न पडले होते. म्हणजे चौकीदार 'रात्रौ पहारा करण्याऐवजी झोपत असे, असा झोपाळू चौकीदार काय कामाचा ?




दोन माणसांचे चेहरे रेखाटताना चित्रकाराने घोटाळा केला आणि एका चेहऱ्याचे वैशिष्ट्य दुसऱ्या चेहऱ्यात बेमालूमपणे मिसळून गेले. हा घोटाळा दूर करण्यासाठी चित्रकाराने परस्पराशी साम्य असणारे आणखी दोन चेहरे काढले. चेहरे झाले एकूण चार. तेव्हा एका चेहऱ्याशी असणारे मिळते जुळते साम्य दुसऱ्या एका चेहऱ्यात कसे काय आढळेल ते दाखवा.

उत्तर :

ए डी      बी सी      इ एच      एफ जी

जो युद्ध करावयास सिद्ध होतो त्याने मरणाला भिऊन कसे चालेल? लढाईत मारणे व मरणे हा वीराचा धर्मच आहे. मरणाला भिऊन युद्धातून पळ काढणारा तो योद्धा कसला? शूरांनी धैर्याने लढले पाहिजे व धैर्याने मेले पाहिजे.

—भगवान् बुद्ध

| प्रश्न | उत्तर |
| --- | --- |
| उत्तम धन कोणते? | —विद्याधन |
| चांगला लाभ कोणता? | —निरोगी शरीर |
| खरं सुख कशात आहे? | — खरेपणाने वागण्यात |
| देवाच्या सेवेपेक्षा श्रेष्ठ सेवा कोणती? | —मातापित्यांची |

—— यक्ष व धर्मराज यांच्यातील प्रश्नोत्तरे

वाचनाचे दोन प्रकार आहेत – एक दुसऱ्यासाठी व एक स्वतःसाठी. आपण जे वाचतो ते आपले आपण लिहिलेले असेल किंवा दुसऱ्याने लिहिलेले असेल. कोणतेही पुस्तक किंवा लेख वाचण्यासाठी हातात घेण्यात दोन हेतू असतात. माहिती किंवा करमणूक.

पुस्तके वा लेख ज्या प्रकारचे असतील त्या प्रकारचा परिणाम वाचणारांच्या मनावर होईल. वाईट पुस्तके वाचण्यापेक्षा काही न वाचणे बरे; कारण काही न करण्याने मनाला निदान कोणताही वाईट नाद तरी लागत नाही. ज्यांनी वाचनाचे पवाडे गायले आहेत, त्यांनी ते चांगल्या वाचनाचे गायले आहेत. पुस्तके हे एक प्रकारचे मित्र आहेत. कुमित्रांच्या संगतीप्रमाणे वाईट पुस्तकांमुळे दुर्गुण जडतात. म्हणून कुमित्राप्रमाणे वाईट पुस्तकांचा सहवास टाळला पाहिजे.

**—गो. ग. आगरकर**

## जादूची अद्भुत बाहुली

शेजारच्या पानावर दिलेली बाहुली ही जादूची अद्भुत बाहुली आहे.
या बाहुलीच्या नाकावर वरच्या बाजूला ∴ असे तीन टिपके आहेत.
याच तीन टिपक्यांकडे सुमारे ३० सेकंद एकाग्र दृष्टीने पहा ... पहात रहा ... !
दृष्टी अजिबात हलवू नका !!!
झाली पूर्ण एकाग्रता ?
आता त्या तीन टिपक्यांवरून नजर बाजूला काढा आणि समोर भिंतीवर पहा, निदान पंधरा ते वीस सेकंद पाहात रहा.
काय दिसते आहे तुमच्या डोळ्यांना ?
तुमच्या डोळ्यांसमोर तीच बाहुली पुनः दिसू लागली ना !
मग आहे की नाही जादूची बाहुली !!



## चित्र रंगवा : पेद्रू

समोरच्या पानावर आमच्या पेद्रूचे चित्र रंगविण्यासाठी दिले आहे. आमच्या ह्या पेद्रूला इंग्रजी वगैरे मुळीच येत नाही; मात्र त्याला इंग्रजी पेहेरावाची भयंकर हौस.

तुम्ही कोणतेही चार रंग घ्या व त्यांचा उपयोग करून सुरेख पेद्रू रंगवा.

आपल्या मित्रांना हा रंगविलेला पेद्रू दाखवा. तसेच असाच पेद्रू तुम्हांला काढता येतो की काय तेही पहा. पहा प्रयत्न करून. जमेल ते तुम्हांला !


D

## चित्र रंगवा : घुबडमित्र

या आधी आतापर्यंत तुम्ही छान छान अनेक चित्रे रंगविलीत. घुबडाचे चित्रही रंगविलेत. त्यावेळी तुम्हांला कोणते रंग कुठे द्यावेत याची सूचना दिली होती. त्याच घुबडाचा हा मित्र. तुम्ही रंगविलेले ते घुबड जेव्हा घुबड संमेलनाला गेले त्यावेळी त्याचे ते सुंदर रूप पाहून सर्वच घुबडे थक्क झाली. त्या घुबड संमेलनात प्रभावित झालेल्या घुबडांपैकी हे एक घुबड आता तुम्हाला विनवीत आहे.

"अहो मलाही त्या घुबडासारखे रंगवा ना?"

मग यालाही रंगवता ना! रंगवाच.



## सोमनाथाचे वैभव ( इ. स. १०२४ )

“ सोमनाथ मंदिरास सागाचे छप्पन खांब होते. मूर्तीच्या गाभाऱ्यात गुडूप अंधार होता; पण तेथे रत्नजडित झुंबरांचा लखलखाट पडत असे. चंद्रग्रहणप्रसंगी लाखोंची यात्रा दर्शनास जमे. भरतीच्या वेळी मूर्तीला समुद्रस्नान होई. मंदिराच्या लोकांनी देवास अर्पिलेल्या नानाविध देणग्यांच्या योगाने मंदिरात अपार संपत्तीचा संचय झाला होता. देवाच्या स्नानास दररोज काशीहून गंगोदकाची कावड येत असे. देवाच्या पूजेस एक हजार ब्राह्मणांची नेमणूक होती आणि पाचशे कलावंतिणी होत्या. मुख्य मूर्तीशिवाय सभोवार सोन्याचांदीच्या आणखी शेकडो मूर्ती होत्या. देवाच्या पूजेस मौल्यवान उपकरणी होती, त्यांची तर गणतीच नाही. या सर्व संपत्तीचा अंदाज दोन कोटी पौंड सहज होऊ शकेल. ”

**—सुप्रसिद्ध इराणी लेखक कझ्वनी याने केलेले वर्णन**

*

## ‘ निकोलो कोंटी ’ ने केलेले विजयनगरचे वर्णन ( इ. स. १४२० )

“ विझेनेगलिया ( विजयनगर ) एका उंच डोंगराच्या पायथ्यापाशी आहे. शहराचा घेर साठ मैलांचा आहे. त्याचे तट पर्वतासारखे उंच असून ते सर्व दऱ्यांना वेढून गेलेले आहेत. राज्यात शहाण्णव हजार लोक लढण्याच्या तयारीत आहेत. घरे-वाडे दगडी आहेत, शहरात पाण्याचे कालवे, मोठमोठ्या बागा आहेत. जिकडे तिकडे सुंदर व विस्तीर्ण देवालये असून वाडे, राजमंदिरे, गोपुरे, तट इत्यादींनी नगरास अलौकिक शोभा आलेली आहे. ठिकठिकाणी ब्राह्मणांच्या पाठशाळाही आहेत. मध्यभागी मुख्य राजवाडा आहे. राजवाड्यात १२००० स्त्रिया असून त्यांतील चार हजार स्वयंपाकखान्यात आहेत. मिरवणुकीच्या वेळी चार हजार स्त्रिया पायी चालतात व चार हजार स्त्रिया सज्ज होऊन मोठ्या आकर्षक रीतीने घोड्यावरून जातात. वर्षप्रतिपदा, महानवमी, दीपावली, होळीचा रंग हे उत्सव अतिशय उत्साहाने व वैभवाच्या थाटामाटात साजरे केले जातात. .... हिऱ्यांच्या खाणी, मोत्यांचे कारखाने, परदेशांतील व्यापार इत्यादींनी नगरात अपार संपत्तीचे भांडार भरलेले आहे. हरेक मंदिरात दागदागिने, रत्ने व संपत्तीचे ढीगच ढीग पडलेले दिसतात. सरदार, अंमलदारांच्या घरी भरलेल्या संपत्तीलाही पारावार नाही. ”

**— सेवेलकृत ‘ विस्मृत साम्राज्य ’ ग्रंथाधार**



# माझे २४ गुरु


[ दत्तात्रेयाने चोवीस गुरू केल्याची एक कथा आहे. सदासर्वकाळ बोधप्रद ठरेल अशी ही कथा आहे. या चोवीस गुरूंचा परिचय आमचे मित्र डॉ. अ. ना. देशपांडे यांनी मुलांसाठी करून दिला आहे. याचे पुनः पुन्हा वाचन करा. मननचिंतन करा आणि आपले जीवन समृद्ध बनवा. ]

मी अवधूत. माझे सगळे अवगुण प्रयत्नपूर्वक धुऊन काढलेले म्हणून अवधूत. तसे माझे नाव दत्तात्रेय. अत्रेय घराण्यात देवाने मला जन्म दिलेला. अत्री ऋषी हे माझे वडील. माझे वडील हे एक श्रेष्ठ पुरुष होते. वडिलांचे नाव अत्री. माझ्या आईचे नाव अनसूया. असूया न बाळगणारी. ती कोणाचाही द्वेष, मत्सर करीत नसे. दुसऱ्याचे दुःख पाहून तीही दुःखी होई वा दुसऱ्याचे सुख पाहून तिला आनंद होई. ती आत्मतृप्त होती. त्यामुळे तिला कोणाचाच हेवा वाटण्याचे कारण नव्हते. अशा थोर आईबापाच्या पोटी मी जन्मास आलो, हे मी माझे मोठे भाग्य समजतो.

माझ्या आईवडिलांनी मला शिकविले, पण मी स्वतःही शिकलो. आपल्या भोवतालची सृष्टी, आपल्या भोवतालचा समाज ही खूप मोठी शाळा आहे. या शाळेत

मी शिकलो. मी सृष्टीचा विद्यार्थी बनलो. जी व्यक्ती, जी वस्तू भेटेल तिला मी गुरू मानून तिच्यापासून योग्य तो बोध घेऊ लागलो. सगळे जगच मी गुरुस्थानी मानले. सगळी सृष्टीच, ज्याचे डोळे उघडे असतील त्याला, सदैव ज्ञानदान करीत आहे असे मला आढळून आले.

**पृथ्वी** : मला प्रथम जाणीव झाली ती पृथ्वीमातेची. सगळी माणसे पृथ्वीच्या पाठीवर राहतात, पण सुखदु:खाची मुळीच कदर न करता तिला बेदरकारपणे वागवितात. ते तिला लाथाडतात, छिन्न-विछिन्न करतात. खूप खोलवर खणून तिला जखमी करतात, पण ती मात्र माणसांवर कधी चिडत नाही, संतापत नाही. सगळे निमूटपणे सहन करते. माताच ती! तिच्याइतकी क्षमाशील वृत्ती जगात अन्यत्र कोठेही सापडणे अशक्य आहे. म्हणूनच क्षमाशील कसे असावे, या बाबतीत मार्गदर्शन करण्याचा व गुरू होण्याचा अधिकार फक्त पृथ्वीमातेलाच आहे. पृथ्वी मूर्तिमंत क्षमा आहे. मूर्तिमंत शांती आहे.




पृथ्वीच्या आश्रयाने राहणाऱ्या पर्वताच्या पोटात रत्ने असतात. त्याच्या अंगावर गवत उगवते. नाना प्रकारच्या वनस्पती उगवतात. त्याच्या अंगावरून पाण्याचे प्रवाह वाहतात. तो नद्यांना जन्म देतो. रत्ने, वनस्पती, पाणी, अशी तीन प्रकारची संपत्ती पर्वताजवळ असते. ही संपत्ती पर्वत त्याच्याजवळून जो नेईल त्याला मुक्त मनाने आनंदाने देऊन टाकतो. त्यातले आपल्यासाठी तो काही राखून ठेवीत नाही. तो देतच राहतो आणि त्याच्याजवळची ही संपत्ती कितीही वेळा संपली तरी देव त्याला ती सतत पुरवीत राहतो. जो दुसऱ्यांना देत राहतो, त्याला देव अखंड पुरवठा करीत असतो. पर्वत हा आपल्या वागणुकीने मनुष्यमात्राला सदैव नि:स्वार्थ परोपकाराचे धडे शिकवीत असतो. पृथ्वी हा माझा पहिला गुरू.

**वारा** : वायू हा माझा दुसरा गुरू, वायू हा सदासर्वदा फिरत असतो. श्रीकृष्णाने अर्जुनाला भगवद्गीतेत, 'तू अनिकेत हो,' असा उपदेश केलेला आहे. वायू हा अनिकेत असतो. त्याला स्वत:चे घर नाही, त्याला त्याची जरूरी नाही. समग्र विश्वच त्याचे घर. भलेबुरे, खरे–खोटे, चांगले-वाईट या सगळ्यात तो मिसळतो; पण इतकेही करून तो मोकळा असतो. तो कशालाही चिकटून राहात


नाही. कशातच तो आसक्त होत नाही. तो सुगंध वाहून नेतो, दुर्गंध वाहून नेतो, पण त्याच्या स्वतःच्याठिकाणी मात्र कोणताच गंध चिकटलेला नसतो. सगळीकडे असून कोठेच नसतो. या जगात मोकळ्या, कोठेही न गुंतलेल्या मनाने, अनासक्त वृत्तीने कसे राहावे याचे प्रात्यक्षिकच वायू आपल्या आचरणातून तुम्हा-आम्हांला सर्वांना दाखवीत असतो.

**आकाश** : हा माझा तिसरा गुरू. आकाशात ढग येतात; कधी कधी खूपच गर्दी करतात; सगळ्या आकाशाला झाकळून टाकतात. पाऊस पडतो खाली जमिनीवर. समुद्रावर भयानक वादळे होतात. आकाशालाही टक्कर देण्याइतके मोठमोठे पर्वत असतात. या सगळ्या घटनांचा आकाशावर काहीच परिणाम होत नाही. या जगात, या विश्वात जे जे काही घडते, ते आकाशातच घडते. कुंभार घट तयार करतो. कारागीर मठ बांधतो. घरात, मठात, आकाश कोंडले गेले असे आपल्याला वाटते, पण ते जसे बाहेर असते – निर्लेप आणि निर्मळ – तसेच ते घरात आणि मठातही निर्लेप आणि निर्मळ असते. घट फुटला, मठ पडला तरी त्यातले आकाश काही फुटत नाही आणि पडत नाही. सुखाच्या वा दुःखाच्या, लाभाच्या वा हानीच्या, कोणत्याही प्रसंगी आपली निर्मळ अलिप्तता यत्किंचितही ढळू द्यावयाची नाही, ही विद्या आकाशाने आदर्शवत वाटावी इतकी आत्मसात केलेली आहे. आकाश या विद्येचा अधिकारी गुरू आहे.

**पाणी** : पाण्यालाही मी गुरू मानलेले आहे. हा माझा चवथा गुरू. पाण्याच्या विस्ताराचे –मग तो विस्तार नदीरूपाने असो, तलावाच्या रूपाने असो वा समुद्राच्या रूपाने असो–दर्शन हे मनाला केवढे आनंद देणारे असते. आणि स्वच्छ, मधुर, शीतल पाण्याचे सेवन हेही अंतरात्म्याला सुख देणारे असते. आपले दर्शन, आपला सहवास हा लोकांना सुखकारक वाटेल, असे पाण्यासारखे आपले वर्तन असावे. पाण्यातली माधुरी आपल्या भाषणातही असावी.



**अग्नी** : हा माझा पाचवा गुरू. अग्नी म्हटला की आपल्या डोळ्यांसमोर लाकडे येतात. काही लाकडे दिसावयास चांगली असतात; पण काही मात्र अगदी वेडीविद्री, कुरूप, ओबडधोबड, कशीच्या कशीच असतात. ही सगळी लाकडे पेटली म्हणजे




त्यातून ज्या अग्नीच्या ज्वाला निघतात त्या कशा शुद्ध, तलम, आणि तेजस्वी असतात. सर्व प्रकारच्या लाकडांत जशी अग्नीची ज्योत असते, त्याचप्रमाणे विश्वातील सर्व चराचर वस्तूत एकच चैतन्य भरलेले असते. हे कळले आणि वर्तनात उतरले म्हणजे हा उच्च, हा नीच, हा श्रेष्ठ, हा कनिष्ठ हा भेदभाव आपल्या दृष्टीतून मावळत जातो. अग्नी आपल्याला समदृष्टी बनवितो.


**चंद्र** : रात्रीच्या वेळी सगळ्या आकाशाला प्रशान्त व मोहक प्रकाशाची चादर पांघरणारा चंद्रमा हाही माझा गुरू आहे. हा सहावा गुरू. चंद्रमा कधी अजिबात दिसेनासा होतो. मग हळूच एवढासा दिसतो. क्रमाक्रमाने मोठा होत जातो. पूर्ण दिसतो. पुन्हा लहान होतो. तो सारखा असा आकारात बदलत असतो; पण हे सगळे बदल वरवरचे. तो मूळचा जेवढा आहे तेवढाच नेहमी असतो. विश्वात, मानवी समाजात, व्यक्तीच्या जीवनात असे सारखे बदल होत असतात; पण या सगळ्या बदलणाऱ्या घटनांच्या मागे कधीही न बदलणारी वस्तू असते. या न बदलणाऱ्या वस्तूवर, चैतन्यावर नेहमी लक्ष असू द्यावे, असे आपल्याला शिकवितो.



**सूर्य** : चंद्रसूर्य ही जोडीच. चंद्र म्हटला की सूर्याची आठवण व्हायचीच. आपण जसे बादलीने विहिरीतील पाणी वर ओढून घेतो. त्याप्रमाणे सूर्य पृथ्वीवरील समुद्रातले पाणी आपल्या किरणांनी शोषून घेतो. ते पाणी तो स्वतः पीत नाही. आपली तहान भागविण्यासाठी तो त्याचा उपयोग करीत नाही. काळसर भुरकट रंगाच्या निरनिराळ्या आकाराच्या ढगांच्या मडक्यांत तो ते पाणी ठेवतो. आणि पावसाळा आला म्हणजे आपल्या किरणांच्या काठ्यांनी ती मडकी फोडतो. पृथ्वीवर जिकडे तिकडे पाऊस पडतो. सगळी धरणीमाता हिरवीगर्द शाल पांघरल्यासारखी दिसू लागते. ती धनधान्याने समृद्ध होऊन जाते. आपण जे परिश्रमाने, कष्टाने मिळवावे त्याचा उपयोग दुसऱ्याला सुखी करण्यासाठी करावा असे सूर्य आपणाला शिकवीत असतो. सूर्य हा माझा सातवा गुरू.




**कुटुंब** : मी एकदा एक कुटुंब पाहिले. अगदी लहानसे. फक्त दोघांचेच. एक कबूतर आणि कबुतरी. त्यांना पुढे पिले झाली. गोड, गुबगुबीत. त्या पिलांत त्यांचा गुंतू नये इतका जीव गुंतला. मर्यादेबाहेर त्यांच्या मोहपाशात अडकला. मुलांचे कौतुक करण्याचा अतिरेक झाला. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच. पोटापाण्याच्या उद्योगाकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष झाले. एक दिवस घरातले अन्न संपले. कबूतर अन्नाच्या शोधार्थ बाहेर पडले.



भटक भटक भटकले, पण कोठे काही मिळाले नाही. तरीही पिलांवरील लोभामुळे भटकतच राहिले. रात्र झाली तरी भटकतच राहिले. कबुतरीला काळजी वाटली. ती कबूतराच्या शोधात निघाली. रात्रभर भटकली. इकडे पिले अन्नासाठी रडली, ओरडली. सकाळ होताच ती घरट्याबाहेर पडली. त्यांना नुकतेच उडता येऊ लागले होते. ती घराबाहेर येतात न येतात तोच त्या पिलांवर एका फासेपारध्याचे लक्ष गेले. त्याने आपले जाळे फेकले. जाळ्यात ती पिले अडकली. कबूतरी घरी परत आली तेव्हा आपली पिले जाळ्यात अडकलेली तिने पाहिली. तिने आक्रोश केला. पिलांना सोडविण्यासाठी ती जाळ्यात गेली. तीही अडकली. कबूतर परत आले. आपली पत्नी व पिले जाळ्यात सापडलेली पाहून तेही रडू लागले. त्यांना बाहेर काढण्यासाठी तेही जाळ्यात गेले. आणि अडकले. त्या फासेपारध्याला भरपूर खाद्य मिळाले. कबुतराच्या कुटुंबाचा नाश कशामुळे झाला ? आसक्तीचा अतिरेक केल्यामुळे. मोहाला मर्यादा न ठेवल्यामुळे. तेव्हा त्या कुटुंबाच्या या शोकांतिकेपासून मी हे शिकलो की आसक्तीचा अतिरेक होऊ देऊ नये, मोहाला मर्यादेबाहेर वाढू देऊ नये. हे कुटुंब हा माझा आठवा गुरू.


**अजगर** : एकदा मी एका अजगराला पाहिले; आणि त्याला गुरू म्हणून वंदन केले. हा माझा नववा गुरू. यदृच्छा लाभात पूर्ण समाधान, हा अजगराचा गुण केवढा महान ? हे पाहिजे ते पाहिजे हा हव्यास नाही. त्यासाठी जीवघेणी धावपळ नाही. सहज विनासायास जे मिळेल त्यावर सदैव संतुष्ट राहावयाचे. असे वागण्यास केवढे अद्भुत धैर्य लागते ? या धैर्याचा धडा मी अजगरापासून शिकलो.



**समुद्र** : मला एकदा समुद्राचे दर्शन झाले आणि तेथे साक्षात् गुरुत्वच अवतरलेले मला दिसले. गुरुत्व म्हणजे मोठेपण. समुद्रात तर सर्व प्रकारचे मोठेपण आहे. विस्ताराचे मोठेपण. खोलीचे मोठेपण. गांभीर्याचे मोठेपण. निस्सीमतेचे मोठेपण. अनेक प्रकारचे मोठेपण हे असे समुद्रात एकवटलेले आहे. पावसाळ्यात समुद्राला कितीतरी नद्यांचे प्रवाह येऊन मिळतात; पण उन्हाळ्यात हे प्रवाह ओसरतात, शुष्क होतात. पण नद्यांचे प्रवाह आले काय किंवा आटले काय, समुद्र कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीत, जेवढाच्या तेवढाच असतो. त्याचा आनंद वाढत नाही की त्याचे दुःख दुणावत नाही. तो नेहमीच, कोणत्याही परिस्थितीत, धीरगंभीर व प्रसन्न असतो. समुद्रापासून हेच शिकावयाचे आहे. समुद्र हा माझा दहावा गुरू.



**पतंग** : एखादा अवगुण टाळावयाला ज्याच्यापासून आपण शिकतो, तोही आपला गुरूच असतो. म्हणूनच तर मी कबूतराला गुरू मानलेले आहे. म्हणूनच मी पतंगालाही गुरू मानलेले आहे. ज्योत दिसली रे दिसली की, त्या ज्योतीच्या मोहाने पतंग आंधळा होतो, त्याचा सगळा विवेक नष्ट होतो. तो मोहवश होऊन ज्योतीवर झडप घालतो. आणि जळून मरून जातो. अतिरेकाच्या आहारी जाऊन जो मोहाला बळी पडतो त्याचा असाच नाश होतो, पतंगापासून मी हे शिकलो. पतंग हा माझा अकरावा गुरू आहे.




**मधमाशी** : मधमाशीची वृत्ती तर माझ्या वृत्तीशी कितीतरी जुळणारी आहे. म्हणून मधमाशी ही स्वाभाविकपणेच मला गुरुस्थानी आहे. ती माझा बारावा गुरू आहे. मधमाशी ही निरनिराळ्या फुलांत जो रस असतो, जो ग्राह्य भाग असतो, त्याचे सेवन करीत असते. आपल्या जीवनात आपल्याला नाना प्रकारचे अनुभव येत असतात. त्यात काही चांगले असतात, काही वाईट असतात. काही अंशतः चांगले, अंशतः वाईट असे असतात. प्रत्येक अनुभवात—मग तो कसाही असो—सार असते. ते सार निरंतर निवडीत असावे आणि त्याच्या सहाय्याने आपल्या भोवतालच्या जीवनाचा, विश्वातल्या अनंत घटनांचा आपण अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असावे. मधमाशीपासून हा बोध मी शिकलो.

**हत्ती** : एकदा काही माणसांनी हत्तीला पकडावयाचे ठरविले. एवढ्या मोठ्या हत्तीला कसे पकडणार ? माणसांनी एक युक्ती केली. त्यांनी एक मोठा खड्डा खणला आणि तो बारीक आकाराच्या लाकडांनी, झाडाच्या डहाळ्यांनी झाकून टाकला; आणि त्यावर हुबेहुब हत्तीच वाटेल अशी भुशाची बनविलेली एक प्रतिमा ठेवून दिली. तेवढ्यात तेथे एक हत्ती आला. त्या हत्तीला पाहताच त्याचा तोल गेला. हा खरोखर जिवंत हत्ती आहे की नाही, हे पाहण्याचे त्याला सुचलेच नाही. तो त्या हत्तीकडे गेला. व त्याच्या अंगावर जाऊन आदळला आणि त्या प्रतिमेसह खोल खड्डयात जाऊन पडला. हत्तीच्या या वर्तणुकीतून अतिरिक्त, अविचारापासून सावध राहण्यास शिकावयाचे आहे. म्हणून हत्तीसुद्धा एक प्रकारे माझा गुरूच आहे. तो माझा तेरावा गुरू आहे.



**मध गोळा करणारा** : ते केवढे मोठे मोहोळ होते ! मधाने तुडुंब भरलेले ! मधमाशांनी सतत परिश्रम करून मधाचा हा संचय केलेला. कशाला जमविला एवढा मध ? माशा नाहीत असे पाहून एक माणूस आला आणि तो मोहोळ घेऊन गेला. त्या माणसाने मला जागे केले. प्रमाणाबाहेर, गरजेपेक्षा फार जास्त धन जमवू नये. आपण जमविलेले धन दुसऱ्यांना आयते मिळते. समाजात आयतोबा, आळशी, निरुद्योगी माणसे वाढतात. छेः, धनसंचयाचा अतिरिक्त हव्यास वाईटच. हा धडा मला शिकविल्याबद्दल त्या माणसाला धन्यवाद. तो माझा चौदावा गुरू.



**हरिण** : सुंदर मखमली हिरवळीत एक हरिण आनंदाने फिरत होते. बागडत होते. तेवढ्यात गाण्याचे मधुर स्वर त्याच्या कानी पडले. ते पारध्याचे गाणे होते. त्या स्वराच्या दिशेने हरिण पळत सुटले आणि शेवटी त्या व्याधाच्या पाशात सापडले. स्वातंत्र्याला मुकले. त्या दुर्दैवी हरिणीने मला हे शिकविले की, नाचगाणे, गाणेबजावणे यांचा षोक हा शेवटी निश्चितच घातक ठरतो. हरिणीला मी गुरू मानतो. हा माझा पंधरावा गुरू.



**मासोळी** : चमचम चमकणारा सुंदर देह असलेल्या त्या मासोळीची मला कीव आली. गळाच्या काट्याला अडकलेला एक मासाचा तुकडा तिला दिसला. तिच्या तोंडाला पाणी सुटले. तो तुकडा पकडावयाला ती गेली आणि गळाला अडकली. जिभेचे चोचले पुरविण्यापायी तिने आत्मनाश करून घेतला. माणसाने जिभेला आवरून ठेवावे, असा बोध मला त्या मासोळीच्या वर्तनातून मिळाला. तिला मी गुरू मानले. ती माझा सोळावा गुरू.



**टिटवा पक्षी** : मासाचा तुकडा तोंडात धरून एक टिटवा पक्षी त्याचे प्रदर्शन करीत आकाशातून परिभ्रमण करीत होता. आकाशात इतरही पक्षी फिरत होते. ते त्याच्यापेक्षा बलाढ्य होते. पण त्यांना मासाचा तुकडा मिळालेला नव्हता. त्यांची नजर टिटव्याजवळच्या मासाच्या तुकड्याजवळ गेली आणि तो तुकडा आपल्याला मिळावा म्हणून ते सर्व पक्षी त्या टिटव्यावर तुटून पडले. लोकांच्या डोळ्यांत भरेल व त्यांचा मत्सराचा विषय होईल असे प्रदर्शन करू नये, हे मी या टिटव्यापासून शिकलो. हा माझा सतरावा गुरू.

**लहान मूल** : लहान मूल हा माझा अठरावा गुरू. ते कसे नेहमी आपल्याच आनंदात मग्न असते. आपले आपल्याशीच खेळत असते. बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसलेल्या आत्मसुखातच सदैव रममाण राहाणे खऱ्या हिताचे आहे, हा बोध मला त्या लहान मुलापासून मिळाला.

**कुमारी** : एकदा एका सद्गृहस्थाच्या घरी मी एक मुलगी पाहिली. तिच्या घरी पाहुणे आले. ते तिला पाहण्याकरिताच आले होते. सोयरिक जुळवायला आले होते. तिचे आईवडील मात्र गावाला गेले होते. त्यांची गैरहजेरी तिने जाणवू दिली नाही. तिने त्या पाहुण्यांचे योग्य प्रकारे स्वागत केले. ती स्वयंपाकाच्या तयारीला लागली. आत जाऊन तांदळासाठी भात कांडू लागली. तिच्या हातातल्या बांगड्यांचा आवाज होऊ लागला. या आवाजाने पाहुण्यांना त्रास होईल! तिला संकोच वाटला. तिने बांगड्या काढून ठेवल्या. एका हातात दोन दोनच ठेवल्या. तरीही आवाज होऊ लागला. मग एकेकच



बांगडी तिने राहू दिली आणि मग ती कांडू लागली. तेव्हा मात्र आवाज झाला नाही. दोघे किंवा त्याहून जास्त माणसे एकत्र आली की, आवाज होतो, बोलाचाली होते, वादविवाद होतो. म्हणून त्या कुमारीच्या वागण्यापासून मी हे शिकलो की, कधी कधी एकटे राहणे हितकारक आहे. चित्ताची एकाग्रता साधण्याला ते फार उपकारक आहे. ती कुमारीसुद्धा मला गुरुस्थानी झाली. तो माझा एकोणिसावा गुरू.

**वृक्ष :** वृक्षाची थोरवी काय वर्णावी? अतिथीचे स्वागत करण्याची कला वृक्षाजवळून शिकावी. जो जवळ येईल त्याला थंडगार सावली द्यावयाची. त्याच्या पदरात फळेफुले टाकावयाची. त्याचा शीण घालवावयाचा त्याला विश्रान्त वाटेल असे त्याच्याशी अदबीने वागायचे. खरेच, अतिथिसत्कार करावा वृक्षानेच. वृक्ष हा माझा विसावा गुरू.


**कारागीर :** एकाग्रतेचा धडा आंगठी सरळ करणाऱ्यापासूनही मी शिकलो. एक कारागीर आंगठी सरळ करीत होता. त्या कामात तो पूर्णपणे गढून गेला होता, तेवढ्यात तिकडून राजाची स्वारी आली आणि त्या कारागिरासमोरून निघून गेली. मागाहून एक माणूस आला. तो त्या कारागिराला म्हणाला, काहो, एवढ्यात राजाची स्वारी येथून गेली काय? तो म्हणाला, मला माहीत नाही. त्याला भानच नव्हते. याला म्हणतात एकाग्रता. ही एकाग्रता मी त्या कारागिरापासून शिकलो. गुरू म्हणून त्याला मनोमन वंदन केले. तो माझा एकविसावा गुरू.






**साप :** तुम्ही साप पाहिलात ना? तो बहुधा एकटा असतो. लोकांचा सहवास टाळतो. अबोल राहतो आणि अखंड सावध असतो. तो जणू काही सर्वांना अखंड सावधानतेचा सक्रिय पाठच देत असतो. हा पाठ मीही त्याच्याजवळून शिकलो. त्याला गुरू मानू लागलो. हा माझा बाविसावा गुरू.


**कोळी** : तो पाहा भिंतीवरचा कोळी. तो आपल्या पोटातून निघालेले धागे मुखाने बाहेर पसरतो, त्यांचे जाळे तयार करतो, त्याच्याशी काही वेळ खेळतो. तसेच परमेश्वराचेही आहे. तो स्वतः-पासूनच जग निर्माण करतो, त्यात काही काळ क्रीडा करतो. सगळे दृश्यविश्व ही परमेश्वराचीच लीला आहे, हे मी त्या भिंतीवरच्या कोळ्यापासून शिकलो. तोही माझा गुरूच. तो माझा तेविसावा गुरू.



**कुंभारीण होणारा कीडा** : एक होता किडा. त्याला एका कुंभारीण माशीने धरले आणि भिंतीवर बांधलेल्या आपल्या घरात नेऊन ठेवले. रात्रंदिवस तो त्या कुंभारणीचे ध्यान करू लागला. ध्यान करता करता तो कुंभारीणच बनला. ज्याचे आपण ध्यान करतो तसे आपण होऊन जातो. म्हणून नेहमी, अखंड भगवंताचे ध्यान करावे, म्हणजे आपण भगवंतासारखे होऊ. भगवंतरूप होण्याचा हा मार्ग मला त्या किड्याने शिकविला. मी त्यालाही गुरू मानले. तो माझा चोविसावा गुरू.



असे मी चोवीस गुरू केले याचा अर्थ असा नाही की, जगात फक्त चोवीसच गुरू आहेत. सगळे विश्वच गुरुरूप आहे. प्रत्येक वस्तू, प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक प्रसंग, प्रत्येक दृश्य, ह्यांना आपण गुरुरूपच मानावे. त्यांच्यापासून जे घेण्या-सारखे असेल ते घ्यावे, त्यांच्याजवळ जे त्याज्य असेल ते आपणही टाकून द्यावे. सतत विनम्र भावाने शिकत असावे. हाच जीवन जगण्याचा श्रेयस्कर, कल्याणकारक मार्ग आहे.





ही एक जादूची अद्भुत बाहुली आहे.

या बाहुलीच्या नाकावर वरच्या बाजूस ∴ असे तीन टिपके आहेत.

तिथे एकाग्र चित्ताने ३० सेकंद पहात रहा.

आता आपली नजर बाजूला करा व समोर भिंतीकडे सहा ते दहा सेकंद पहा.

तीच बाहुली पुनः दिसते ना ? मग आहे ना ही जादूची अद्भुत बाहुली !